दैनिक

# लोकरक्षणाय

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com   epaper.lokrakshanay.com   dainiklokrakshanay@gmail.com   97023 86118

●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२६० ●पृष्ठे-०४ ●ठाणे, रविवार, ३ मार्च २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-


## ७ मार्चकडे राज्याचं लक्ष ! ठाकरे गटाची 'ती' मागणी सुप्रीम कोर्टाने केली मान्य



**मुंबई, यश सावंत :** शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणामध्ये ७ मार्चची तारीख अत्यंत महत्त्वाची ठरण्याची शक्यात आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी या प्रकरणात दिलेल्या निकालाला उद्धव ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे. या याचिकेवर 7 मार्च रोजी देशाचे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि मनोज मिश्रा यांच्या त्रिसदस्यीय खंडपीठापुढे सुनावणी होणार आहे. महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाच्या काळात शिवसेनेमध्ये उभी फूट पडली त्यावेळी विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या गटात गेलेल्या आमदारांच्या अपात्रतेचा विषय सर्वोच्च न्यायालयाने विधानसभा अध्यक्षांकडे सोपवला होता. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निदेर्शानुसार या प्रकरणाचा न्यायनिवाडा विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केला. आपला निकाल देताना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वातील गटाला शिवसेना पक्ष म्हणून मान्यता दिली. तसेच शिंदे गटात सहभागी झालेल्या आमदारांना पात्र ठरवण्यात आलं. पक्षांतरबंदी कायद्यानुसार हे आमदार अपात्र ठरवले जावेत अशी ठाकरे गटाची मागणी होती.

विधानसभा अध्यक्षांच्या या निर्णयाला उद्धव ठाकरे गटाकडून सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. सरन्यायाधीश चंद्रचूड यांच्यासमोर शुक्रवारी 1 मार्च रोजी ही याचिका सादर करण्यात आली होती. मात्र, न्यायालयाच्या कामकाजात याचिकेचा समावेशच करण्यात आला नव्हता. ठाकरे गटाचे वकील तसेच ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी ही गोष्ट न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. या प्रकरणात लवकरात लवकर सुनावणी घेण्याची विनंती सिब्बल यांनी केली. न्यायालयाने त्यांची विनंती मान्य केली असून हा ठाकरे गटासाठी दिलासा मानला जातोय.

## नमो महारोजगार मेळाव्यातून तरुणाईला स्वतःचे आणि राज्याचे भविष्य घडविण्याची एक मोठी संधी – मुख्यमंत्री शिंदे



**बारामती, रोहित जसवाल :** नमो महारोजगार मेळाव्यातून तरुणाईला स्वतःचे आणि राज्याचे भविष्य घडविण्याची एक मोठी संधी मिळाली आहे. असे सांगतानाच बारामती येथे आयोजित या मेळाव्यातून २५ हजार युवांना रोजगार मिळेल, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले आहेत. बारामती शहर हे एक विकासाचे प्रारूप (मॉडेल) आहे, असेही यावेळी ते म्हणाले.विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्यावतीने आयोजित पुणे विभागस्तरीय 'नमो महारोजगार मेळाव्या'च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

मेळाव्यात तरुणाईला मार्गदर्शन मिळेल आणि रोजगारही उपलब्ध होईल. यापूर्वी नागपूर, लातूर, अहमदनगर येथे मेळावे झाले असून बारामती येथे आयोजित हा मेळावा सर्व विक्रम मोडणारा असून यातून २५ हजार युवांना रोजगार मिळेल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

बारामती शहर हे एक विकासाचे प्रारूप (मॉडेल) आहे. शहराच्या विकासात शरद पवार, अजित पवार यांचे मोठे योगदान आहे. विकासकामे करताना सर्व कामे वेळेत आणि दजेर्दार व्हावीत हा उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा कटाक्ष असतो. आज उद्घाटन झालेल्या प्रकल्पांच्या दर्जात कुठेही तडजोड झाली नाही, हे दिसून येते, असं ते म्हणाले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तरुणाईला थेट नियुक्तीपत्रे देण्याचा कार्यक्रमांतर्गत जवळपास १० लाख युवकांना नोकऱ्या देण्याचे लक्ष्य ठेवले आहे. राज्य शासनही यात कुठेही कमी पडणार नाही. प्रधानमंत्री कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत १ कोटी ४० लाख विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जात आहे. नवीन शिक्षण धोरणामधील अभ्यासक्र मातही कौशल्य विकास अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात आला आहे. याशिवाय मुख्यमंत्री स्वयंरोजगार योजनेतून रोजगार देणारे हात निर्माण करण्याचाही शासनाचा प्रयत्न असल्याचे ते म्हणाले. गेल्या दोन वर्षात दाओस येथे जवळपास ५ लाख कोटींचे सामंजस्य करार झाले असून यातून ४ ते ५ लाख रोजगार निर्माण होणार आहेत.

## आता रेल्वेत मराठी वृत्तपत्रे उपलब्ध; मनसेच्या तक्रारीनंतर प्रशासनाने घेतला निर्णय !

**रत्नागिरी, दिगंबर जाधव :** मनसे नेते नितीन सरदेसाई यांच्या तक्रारीनंतर मुंबईतून सुटणाऱ्या तेजस एक्स्प्रेससह अन्य रेल्वे गाड्यांमध्ये आता प्रवाशांना मराठी वृत्तपत्रे वाचण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत. चार दिवसांपूर्वी नितीन सरदेसाई तेजस एक्स्प्रेसमधून प्रवास करत असताना त्यांना मराठीऐवजी इंग्रजी वृत्तपत्र देण्यात आले होते. त्यानंतर त्यांनी रेल्वेच्या कारभारावर नाराजी व्यक्त केली होती. त्यांनी दादर स्थानकावरून तेजस एक्स्प्रेस पकडली. सरदेसाई रत्नागिरीपर्यंत प्रवास करत होते. प्रवासादरम्यान त्यांना वाचायला इंग्रजी वृत्तपत्र देण्यात आले. त्यानंतर सरदेसाई यांनी रेल्वेच्या कारभावर नाराजी व्यक्त करत मराठी भाषेला कसे डावलले जाते यासंदर्भात स्वतःचा व्हिडीओ तयार करत त्यांनी आपल्या अधिकृत फेसबुक खात्यावर हा व्हिडीओ शेअर केला होता. सरदेसाई यांचा व्हिडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल होताच, आयआरसीटीसीने याची दखल घेत तत्काळ मराठी वृत्तपत्रे न दिल्याबद्दल संबंधित ट्रेन ऑपरेटरला ताकीद दिली. त्यानंतर तेजस एक्स्प्रेससह अन्य मेल-एक्स्प्रेस गाड्यांमध्ये प्रवाशांना वाचण्यासाठी मराठी वृत्तपत्रे उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

## धर्मादाय आयुक्तालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांची निवडणूक कामांतून तूर्त सुटका



**मुंबई, विशेष प्रतिनिधी :** धमार्दाय आयुक्तालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना आगामी लोकसभा निवडणुकीची कामे लावण्याच्या केंद्रीय निवडणूक आयोगाच्या आदेशाला उच्च न्यायालयाने शुक्रवारी स्थगिती दिली. निवडणूक कामे लावण्याचे आदेश काढण्यापूर्वी धमार्दाय आयुक्तालयातील अधिकारी-कर्मचारी संख्येचा, त्यांना ही कामे लावली गेल्याने त्यांच्या मूळ कामांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास केला आहे का, अशी विचारणाही न्यायालयाने निवडणूक आयोगाला करून त्याबाबत पुढील सुनावणीच्या वेळी स्पष्टीकरण देण्याचे आदेश दिले. धर्मादाय आयुक्तालयाला अर्धन्यायीक दर्जा असून त्यातील अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून केल्या जाणाऱ्या कामाचे स्वरूप लक्षात घेऊन त्यांना लोकसभा निवडणूक कामे लावण्याबाबत काढलेल्या आदेशाची पुढील सुनावणीपर्यंत अंमलबजावणी केली जाऊ नये. शिवाय, या कर्मचाऱ्यांना निवडणूक कामे लावण्याबाबत कोणतीही नोटीस बजावण्यात येऊ नये, असेही मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले. धमार्दाय आयुक्तालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना निवडणूक कामे लावल्यास तेथील कामकाज ठप्प होईल आणि सामान्य जनतेच्या अधिकारांना बाधा येईल, असेही न्यायालयाने उपरोक्त आदेश देताना स्पष्ट केले. निवडणूक कामांना नकार देणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर फौजदारी कारवाई करण्याचा आदेश राज्य सरकार आणि निवडणूक आयोगाने काढला आहे. त्याविरोधात खुद्द धमार्दाय आयुक्तांनी उच्च न्यायालयात धाव घेऊन या प्रकरणी तातडीची सुनावणी घेण्याची मागणी केली होती. त्या पार्श्वभूमीवर, या प्रकरणी शुक्रवारी तातडीची सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी. निवडणूक नोंदणी अधिकारी किंवा जिल्हाधिकाऱ्यांनी या अधिकारी-कर्मचाऱ्यांना आगामी लोकसभा निवडणुकीची कामे लावण्याचे आदेश दिले आहेत ही बाब धमार्दाय आयुक्तालय वकील संघटनेच्या वतीने वकील आर. डी. सोनी यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली.

## अभिषेक घोसाळकर हत्या प्रकरणातील अमरेंद्र मिश्राची जामीनासाठी मुंबई सत्र न्यायालयात धाव, तेजस्विनी घोसाळकरांचा विरोध



**मुंबई, विशाल कारंडे :** अभिषेक घोसाळकर हत्या प्रकरणातील आरोपी अमरेंद्र मिश्राने जामिनासाठी मुंबई सत्र न्यायालयात धाव घेतली असल्याचे समजत आहे. मात्र मिश्रा याच्या जामिनास अभिषेक घोसाळकर यांच्या पत्नी तेजस्विनी घोसाळकर यांनी विरोध दर्शविला आहे. या प्रकरणी न्यायालयाने 5 मार्चपर्यंत सुनावणी तहकूब केलीय. ठाकरे गटाचे माजी नगरसेवक अभिषेक घोसाळकर यांच्यावर फेसबूक लाईव्हमध्ये गोळीबार झाला. आणि एकच खळबळ उडाली. त्यांची गोळीबाराची व्हिडीओ क्लिप वाऱ्यासारखी व्हायरल झाली. या गोळीबारात अभिषेक घोसाळकर यांचा मृत्यू झाला. तर वैयक्तिक वैमनस्यातून घोसाळकर यांच्यावर गोळ्या झाडणारा मॉरिसने देखील स्वतःला गोळ्या झाडल्या. मॉरिसने आधी त्याच्या अधिकृत फेसबुक अकाउंटवर फेसबुक लाईव्ह केलं होतं. त्यावेळी या दोघांनी समाजासाठी एकत्र आल्याचं म्हटलं. अभिषेक घोसाळकर यांचं बोलणं संपवून उठत असताना त्यांच्यावर अचानक गोळ्या झाडण्यात आल्या. गोळ्या झाडल्यानंतर मॉरिसनंही स्वतःवर गोळ्या झाडून घेतल्या. या प्रकरणात मॉरिसचा अंगरक्षक अमरेंद्र मिश्रा याला पोलिसांनी ताब्यात घेतले होते. आरोपी मॉरिसचा अंगरक्षक अमरेंद्र मिश्रा काही महिन्यांपूर्वीच वैयक्तिक सुरक्षारक्षक म्हणून काम करत होता. मात्र या प्रकरणा नंतर पोलिसांनी त्याला अटक केली होती. अमरेंद्र हा मूळचा उत्तर प्रदेशचा आहे. आरोपी अमरेंद्र मिश्राने पिस्तुलाचा परवाना उत्तर प्रदेशातून काढल्याचे स्पष्ट झाले आहे. त्याच्याकडील पिस्तुलाची नोंदणी मुंबईत करण्यात आली नसल्याचे सूत्रांनी सांगितले. अमरेंद्रने भाईंदर पोलिसांकडे जमा केलेला शस्त्रपरवाना खरा आहे की नाही, याची पडताळणी करायची आहे, असे पोलिसांनी दंडाधिकाऱ्यांना सांगितले होते. उत्तर प्रदेश सरकारने आपल्याला शस्त्रपरवाना दिला आहे, असे मिश्राचे म्हणणे होते. त्याशिवाय बंदुकीच्या बदल्यात मॉरिसने अमरेंद्रला काही पैसे दिले होते का? अमरेंद्रने त्याच्या परवान्याची नोंद मुंबई पोलिसांकडे का केली नाही? तसेच त्याने त्याचे वेतन व अन्य बाबींची नोंद पोलिसांकडे का केली नाही? अशा अनेक प्रश्नांची चौकशी पोलीस करत आहेत.

## मुंबईतील चंदनवाडी भागातील सोने-चांदी गाळणाऱ्या १२ भट्टीवर पालिकेची कारवाई



**मुंबई, विशाल पाटील :** चंदनवाडी सी विभागातील पटवा चाळ, तेली गल्ली या नागरी वस्त्यांतील सोने-चांदी गाळणाऱ्या व्यावसायिकांच्या १२ भट्टी, धुराड्यांवर पालिकेने कारवाई केली. वायुप्रदूषणास कारणीभूत ठरत असल्याने पालिकेने कारवाईचा बडगा उगारला आहे. यापुढेही कारवाई सुरू राहणार असल्याचे सी विभागाचे सहायक आयुक्त उद्धव चंदनशिवे यांनी दिली. पालिकेतील वायुप्रदूषण व धूळ नियंत्रणासाठी पालिका प्रशासनाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निदेर्शानुसार महापालिका प्रशासनाची सातत्याने कारवाई सुरू आहे. पालिका आयुक्त इकबाल सिंह चहल यांच्या निदेर्शानुसार महापालिकेच्या सर्व २४ प्रशासकीय विभागांत उपाययोजनांची अंमलबजावणी सुरू आहे. व्यापक आरोग्य हित लक्षात घेता वायुप्रदूषणास कारणीभूत ठरणाऱ्या इतर घटकांवरही महापालिका प्रशासन कठोर कारवाई करत असल्याचे प्रशासनाने सांगितले. नागरी वस्तीत सोने- चांदी वितळवणाऱ्या आणि आम्ल भट्टींवर (एसिड फर्नेस) पालिकेच्या सी विभाग कार्यालयअंतर्गत इमारत आणि कारखाने विभागाने सक्त कारवाईचा बडगा उगारला आहे. गुरुवारी सी विभागातील पटवा चाळ आणि तेली गल्ली येथील सोने-चांदी गाळणाऱ्या व्यावसायिकांचे एकूण १२ धुराडे (चिमणी) काढण्यात आले. अशा प्रकारची कार्यवाही यापुढेही सुरू राहणार आहे, असे चंदनशिवे यांनी सांगितले. सोने-चांदी गाळणाऱ्या व्यवसायात सोने-चांदी वितळवण्यात येते. त्यासाठी छोटेखानी स्वरूपाचा कारखाना असतो. यात सोने-चांदी वितळवण्यासाठी भट्टीचा वापर केला जातो. त्यातून निर्माण होणारे आम्ल आणि वायू आदी चिमणी, धुराडे याद्वारे हवेत सोडले जातात.

## उद्धव ठाकरेंचा सोमवारी नवी मुंबई दौरा



**उरण ,भावना जैन :** लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मावळ लोकसभा मतदार संघातील पनवेल, खालापूर,उरण या तीन विधानसभा मतदारसंघात शिवसेनेचे कार्याध्यक्ष तथा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या ४ मार्च रोजी तीन सभा होणार आहेत. या झंझावाती जनसंवाद दौऱ्यात महाविकास आघाडीतील शिवसेना (ठाकरे गट ) ,कॉंग्रेस, राष्ट्रवादी ( शरद पवार गट ) , शेकाप, समाजवादी पार्टी आदी घटक पक्षांचे नेते , पुढारी उपस्थित राहणार असल्याची माहिती उरणचे माजी आमदार तथा शिवसेना जिल्हा प्रमुख मनोहरशेठ भोईर यांनी शनिवारी (२) पनवेल,उरण, खोपोली येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेतून दिली.मावळ विधानसभा मतदारसंघातील पनवेल, खालापूर,उरण विधानसभा मतदार संघात शिवसेनेचे कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या जनसंवाद मेळाव्याला माजी खासदार अनंत गीते, मिलिंद नार्वेकर, संजोग वाघेरे पाटील, महाआघाडीतील शेकापचे आमदार जयंत पाटील, माजी आमदार बाळाराम पाटील, कॉंग्रेसचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेंद्र घरत,आर. सी.पाटील,राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रशांत पाटील समाजवादी पार्टीचे अनंत पाटील आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या जनसंवाद दौऱ्यात शेतकऱ्यांच्या प्रचंड विरोधानंतरही होऊ घातलेला विरार-अलिबाग कॉरीडॉर, नैना,तिसरी मुंबई, नियोजित एमआयडीसी प्रकल्प खोपटा नवनगर प्रकल्प,सिडकोचे प्रलंबित विविध प्रश्न,उरण येथील रखडलेल्या १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय, इंजिनिअरिंग कॉलेज,रानसई धरणाची उंची आणि गाळाची समस्या,रखडत सुरू असलेले करंजा मच्छीमार बंदर, नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ बाधीत प्रकल्पग्रस्तांच्या समस्या, जेएनपीए व सिडको प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचा अद्यापही न सुटलेला साडेबारा टक्के भूखंड वाटपाचा प्रश्न, जेएनपीए विस्थापित करून पुनर्वसित नवीन शेवा, हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांचा प्रश्न, बेरोजगारी , नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध समस्या आणि राज्यातील महायुतीच्या अनागोंदी, मनमानी कारभाराचा उध्दव ठाकरे ठाकरी भाषेत समाचार घेणार आहेत.

## पुण्यात पुन्हा १५० कोटींहून अधिक किंमतीचा मोठा ड्रग्ज साठा जप्त



**पुणे, अभिजित येरल्लू :** पुणे शहरात शनिवारी पुन्हा मोठ्या प्रमाणावर ड्रग्स जप्त करण्यात आलेत. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने आणखी एक मोठी कारवाई केली आहे. विश्रांतवाडी भागातून ८० किलोहून अधिक एमडीड्रग्स जप्त करण्यात आलेत. ८० किलो पेक्षा आधिक ड्रग्सची किंमत जवळपास १५० कोटी रुपयांच्या घरात आहे. पुणे ड्रग्स रॅकेट प्रकरणी पोलिसांचा तपास सुरूच आहे. अशात आता पोलिसांनी शनिवारी पुन्हा एकदा मोठी छापेमारी केली आहे. विद्येचं माहेरघर असलेल्या पुण्यामध्ये उडता पंजाबप्रमाणे चित्र निर्माण झालं आहे. वारंवार ड्रग्सचं मोठं रॅकेट समोर येत असल्याने पुणे शहराला उडता पुणे म्हणण्याची वेळ आली आहे. विश्रातवाडीमध्ये एक साठा जप्त करण्यात आला होता. आरोपीकडून याबाबतच चौकशी सुरू असताना एका ट्रकमध्ये ३४० किलो एमडी बनवण्यात येणारे रॉ मटेरियल असल्याचे समजले. त्या माहितीनूसार छापा टाकून एमडी ड्रग्सचे रॉ मटेरिएल जप्त करण्यात आलेत. सदर प्रकरणी एकूण ९ आरोपींची नावे समोर आली आहेत. पोलिसांनी चौकशीतून मिळालेल्या माहितीमधून आपली कामगीरी चोख बजावलीये. ड्रग्जबाबत अधिक तपास सुरू आहे. ही एक सप्लाय चेन होती. त्यामुळे या प्रकरणी अनेकजण रडावर आहेत. यातील ड्रग्ज परदेशी पाठवलं जात होतं, आता याचा तपास केंद्रीय तपास यंत्रणा करत आहेत, अशी माहिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे.

## तरुण पिढीला रोजगार देण्याची गरज; राजकारण सोडून तरुणांसाठी सगळ्यांनी एकत्र यावे; शरद पवार




**बारामती, नितीन देवळेकर :** देशाच्या तरुणांच्या बेरोजगारीचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यातच आता सरकारनेदेखील या तरुणांना रोजगार मिळवून देण्यात लक्ष दिल्यानं त्याचे आभार मानतो. आजच्या तरुण पिढीला रोजगार देण्याची गरज आहे, त्यासाठी राजकारण सोडून सगळ्यांनी एकत्र यावं, असं ज्येष्ठ नेते शरद पवार म्हणाले. बारामतीत नमो रोजगार मेळाव्यात संबोधित करताना ते बोलत होते.शरद पवार म्हणाले की, विद्या प्रतिष्ठनच्या माध्यमातून अनेक तरुण- तरुणींना नोकऱ्या मिळाल्या. देशात मोठ्या प्रमाणाच बेरोजगारीचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. हाच प्रश्न ओळखून आता सरकार तरुणांना नोकऱ्या देण्याचं ठरवलं आहे. तरुणांना रोजगार मिळावा म्हणून प्रयत्न केले. त्यासाठी मी त्यांचं अभिनंदन करतो आणि आभारदेखील मानतो. आतापर्यंत विद्या प्रतिष्ठानच्या मार्फत अनेक तरुणांना रोजगार दिला आहे. त्यासाठी वेगवेगळ्या क्षेत्रातील लोकांची मदत घेतली आहे. आता विद्या प्रतिष्ठानमधे आर्टिफिशियल इंटेलिजन्सचे पहिले महाविद्यालय सुरु होत आहे. राजकारण आपल्या जागी होत असते. पण तरुणांना नवीन रोजगार देण्यासाठी सर्वांनी एकत्र यायला हवे. मी मुख्यमंत्री आणि त्यांच्या सहकार्यांना खात्री देऊ इच्छितो की विकासासाठी आम्ही सदैव तुमच्या पाठिशी राहू, असंही त्यांनी स्पष्ट केलं आहे.

## नागपूर महापालिकेतील ज्येष्ठ नागरिक कक्ष बंद, समस्या मांडण्याचे हक्काचे व्यासपीठ हिरावल्याची जेष्ठांमध्ये भावना



**नागपूर, सचिन कदम :** ज्येष्ठ नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या, प्रश्न यांचे निराकरण व्हावे, या उद्देशाने महापालिकेच्या मुख्यालयी सुरू करण्यात आलेला ज्येष्ठ नागरिक कक्ष प्रशासकाच्या नियुक्तीपासून बंद पडला आहे. हा कक्ष सुरू करण्यात यावा, यासंदर्भात वारंवार पत्रव्यवहार करण्यात आला. मात्र, त्याचा उपयोग झाला नाही. परिणामतः समस्या मांडण्याचे हक्काचे व्यासपीठ हिराविल्याची भावना व्यक्त होत आहे. सीनिअर सिटिझन कौन्सिल ऑफ नागपूर डिस्ट्रिक्टच्या सहकार्याने नागपूर महापालिकेच्या सिव्हिल लाइन्स येथील मुख्यालयात ज्येष्ठ नागरिक कक्ष उभारण्यात आला होता. त्या कक्षाचे उद्घाटन तत्कालीन महापौर दयाशंकर तिवारी यांच्या हस्ते झाले होते. त्यावेळी ज्येष्ठांना हक्काची जागा मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात येत होती. त्या कक्षाला ज्येष्ठांचा चांगला प्रतिसाद मिळत होता. दर मंगळवार आणि गुरुवार असे दोन दिवस हे केंद्र दुपारी १२ ते २ वाजतादरम्यान सुरू असायचे. ज्येष्ठ नागरिकांच्या अडचणी सोडवून त्यांना दिलासा मिळवून देण्याचे कार्य ज्येष्ठ नागरिक केंद्रामार्फत व्हायचे. ज्येष्ठ नागरिकांच्या अडचणी, प्रश्न सोडविण्यासाठी या कक्षामध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या संघटनेचा एक पदाधिकारी सेवारत असायचा. यासाठी आवश्यक सहकार्य महापौर कार्यालयामार्फत केले जायचे. ह्यआझादी-७५ह्णच्या अनुषंगाने शहरामध्ये विविध सामाजिक उपक्रम राबवून नागरिकांना सुविधा मिळवून देण्याचा प्रयत्न नागपूर महापालिकेने केला होता. त्याच शृंखलेत ज्येष्ठ नागरिकांना अंतर्भूत करत त्यांच्यासाठी कक्ष सुरू करण्यात आला होता.

## 'अत्याचार, दुसरं नाव म्हणजे TMC'; बंगाल दौऱ्यावर मोदींचा हल्लाबोल



**नवी दिल्ली, प्रगती शर्मा:** लोकसभा निवडणुकीपूर्वी बंगाल दौऱ्यावर आलेल्या पंतप्रधान मोदींनी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यावर जोरदार निशाणा साधला. कृष्णनगरमध्ये एका जाहीर सभेला संबोधित करताना मोदी म्हणाले की, टीएमसी हे अत्याचाराचं दुसरं नाव आहे. टीएमसीने गरिबांची लूट केली आहे. ममता बॅनर्जींच्या टीएमसीला लोकांना गरीब ठेवायचे आहे. त्यामुळे पश्चिम बंगालचा विकास होणं आवश्यक आहे. मोदींनी पश्चिम बंगालला पहिलं एम्स दिलं आहे. जाहीर सभेला संबोधित करताना पंतप्रधान मोदींनी म्हणाले की, 'ही भूमी भगवान कृष्णाच्या भक्तीचे सर्वोच्च प्रचारक चैतन्य महाप्रभू यांची जन्मभूमी आहे. चैतन्य महाप्रभूंच्या चरणी नतमस्तक होतो. हे माझे सौभाग्य आहे की काही दिवसांपूर्वीच मला समुद्राच्या खोल पाण्यात जाऊन भगवान श्रीकृष्णाच्या प्राचीन भूमीला, भगवान श्रीकृष्णाने स्थापन केलेल्या द्वारका नगरीला नमन करण्याचं भाग्य लाभले.'

'एवढ्या मोठ्या संख्येने तुम्ही सर्वजण इथे जमलेले पाहून 'एनडीए सरकार, 400 पार' हे सांगण्याचा आत्मविश्वास मला मिळत आहे. पश्चिम बंगालमध्ये हा माझा दुसरा दिवस आहे. गेल्या 2 दिवसात मला बंगालसाठी विविध प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी करण्याची संधी मिळाली. यामुळे गुंतवणूक येईल, रोजगाराच्या संधी निर्माण होतील आणि शेजारच्या भागावर परिणाम होईल. मात्र, तृणमूल सरकारने बंगालच्या जनतेचा अपेक्षाभंग केला आहे, हे मान्य करावे लागेल. लोकांची ते सतत फसवणूक करत आहेत.' बंगालमध्ये ज्या प्रकारे टीएमसी सरकार चालवत आहे, त्यामुळे बंगालची निराशा झाली आहे. पश्चिम बंगालच्या जनतेने मोठ्या अपेक्षेने टीएमसीला एवढा मोठा जनादेश वारंवार दिला आहे, पण टीएमसी हे अत्याचार आणि विश्वासघाताचे दुसरं नाव झालं आहे.

//सुविचार
मोठमोठ्या गोष्टी करणारे लोकं मोठे नसतात,
तर छोट्या-छोट्या गोष्टी समजून घेणारे मोठे असतात. //



## निरोगी हृदयासाठी कमळदेठ



**आयुर्वेदाच्या** ग्रंथांमध्ये 'कमळ' हे हृदयासाठी उपकारक सांगितले आहे. हे प्रत्यक्षात सत्य आहे काय? कमळदेठांचे शास्त्रीय पृथक्करण केले असता असे लक्षात येते की, १०० ग्रॅम कमळदेठांमध्ये तब्बल ३००० मिली 'पोटॅशिअम' असते. पोटॅशिअम हे रक्तामधील मिठाचे प्रमाण वाढू देत नाही, ज्यामुळे रक्तातले पाणी वाढत नाही. त्यामुळे रक्तवाहिन्यांवरचा ताण कमी होतो.

हृदयासाठी जोराने पंपिंग करावे लागत नाही, हृदयाला आराम मिळतो व रक्तदाबसुद्धा नियंत्रणात राहतो. थोडक्यात, मीठा (सोडिअम)च्या बरोबर उलटा परिणाम पोटॅशिअम करते. संशोधनानुसार सिद्ध झाले की, पोटॅशिअमच्या कमतरतेमुळे हार्टअ‍ॅटॅक, पॅरालिसिसचा अ‍ॅटॅक येऊ शकतो. म्हणूनच कमळदेठ हृदयासाठी उपकारक आहे, हे सत्य आहे.

# तरुणाईचा लाडका 'गॉगल'

**उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा, ऋतू कोणताही असो, गॉगल्सचे चाहते कमी नाहीत. कधी काळी गॉगल ही 'फॅशन' या सदरात मोडणारी वस्तू होती, पण आज ती फॅशनबरोबरच अत्यंत गरजेची वस्तू बनली आहे. गॉगल ही तरुणाईची लाडकी गोष्ट बनली आहे.**



खेळाडू, खास करून क्रिकेटपटू तर मैदानात गॉगल लावून खेळताना दिसतात. ते पाहून तरुणाईला गॉगल वापरण्याचा आणखी उत्साह येतो. गॉगल प्रत्येकाच्या आवडीची वस्तू बनली आहे. प्रत्येक जण त्याच्या आवडीने गॉगल घेतो. काही जण तर अगदी महिन्याच्या महिन्याला गॉगल बदलतात. त्यांच्या किमतीही काही शेकड्यापासून तर काही हजारांपर्यंत असतात.



गॉगल ही गरजेची गोष्ट आहे हे मान्य केले, तरी पण प्रश्न असा पडतो की, गॉगल वापरताना आपण खरंच डोळे उघडे ठेवून गॉगल घेतो का? आणि वापरतो का? रस्त्याच्या कडेला मिळणारे वा एखाद्या पेट्रोल पंपाच्या बाजूला मिळणारे अगदी कमी किमतीचे गॉगल अनेक जण वापरतात. ते खरोखर उपयुक्त असतात का? फायदेशीर असतात का? त्यापासून काही त्रास तर होणार नाही?

याचा विचार किती जण करतात? रस्त्यावरच्या गॉगल्सची एक गोष्ट झाली. आपण मोठ्या पॉश दुकानातून भरभक्कम रक्कम देऊन गॉगल खरेदी करतो, तेव्हाही ते आपल्या डोळ्यांना 'सूट' होतात का, याचा विचार कधी करतो का? डोळ्यांचे रक्षण हा गॉगल वापरण्यामागचा सर्वात मुख्य हेतू. हीच गॉगलची सर्वप्रथम गरज. बाकी स्टाईल वगैरे दुय्यम गोष्टी. पण त्यांनाच अधिक महत्त्व दिले जाते, हे एक कटू सत्य आहे. गॉगल घेण्यामागे कारण काय? बरेच जण स्टाईलसाठी गॉगल घेतात. काही जण डोळ्यात कचरा जाऊ नये, ऊन लागू नये, तसेच थोडी स्टाईल पण असावी म्हणून गॉगल घेतात.

**गॉगल मुळीच न वापरणारा असा देखील एक वर्ग आहे**

खरं तर गॉगल ही एक अशी वस्तू आहे, जी प्रत्येकाने वापरावी, अगदी लहान मुलांपासून ते मोठ्यांपर्यंत. फक्त आणि फक्त एकाच मुख्य हेतूसाठी, ते म्हणजे डोळ्यांचे संरक्षण! आपण दिवसभरात भरपूर वेळ उन्हामध्ये वावरत असतो, मुख्य करून प्रवास करताना. घर-ऑफिस-घर हा तर आपला नित्यनेमाचा अगदी न चुकणारा दररोजचा प्रवास. कधी सार्वजनिक वाहनाने, कधी स्वतःच्या दुचाकी-चारचाकी वाहनाने आणि प्रसंगी काही अंतर चालतसुद्धा आपण जात असतो. आपले शरीर तर कपड्यांनी झाकलेले असते, पण डोळ्यांचे काय? ते तर सरसकट रोज त्रास सहन करत असते. त्यापासून रक्षण करण्यासाठी गॉगल उपयुक्त ठरतात, नव्हे आवश्यकच असतात.



**सर्वसाधारणपणे आपल्या रोजच्या जेवणात दह्याचा समावेश असतो. परंतु, अनेक वेळा आपल्याकडून दह्याकडे दुर्लक्ष केले जाते. दह्याचे फायदे जाणून घेतल्यावर नक्कीच तुम्ही दह्याला दुर्लक्षित करणार नाही.**

## गुणकारी दही!

**दूध नापसंत असणाऱ्यांसाठी दही चांगला पर्याय :** ज्यांना दूध पिणे आवडत नाही, त्यांना दही चांगला आणि आरोग्यवर्धक पर्याय ठरू शकतो. दह्यामुळे शरीरातील न्यूट्रिशनमध्ये वाढ होण्यास मदत होते, जे काम दूधदेखील करते.

पचनास मदतकारक : तुमची पचनशक्ती दह्यातील न्यूट्रियंट्स सहजपणे शोषून घेते. त्याचबरोबर तुम्ही खालेल्या इतर अन्नघटकांमधील न्यूट्रियंट्स शोषून घेण्यात दही मदत करते. ज्यायोगे जेवणाचे सहज पचन होण्यास मदत होते. दह्याच्या सेवनाने उदरात निर्माण होणारी दाहकता कमी होण्यास मदत होते. अशी दाहकता अति तिखट भोजनामुळे निर्माण होते.


निरोगी हृदय : हल्लीच्या तणावपूर्ण जीवनशैलीत हृदयविकाराची समस्या सर्वसाधारण झाली असताना, या समस्येस दूर ठेवण्यासाठी दही गुणकारी ठरते. उच्च रक्तदाबाचा धोका दह्यामुळे कमी होण्यास मदत होते. त्याचबरोबर कॉलेस्ट्रॉलची मात्रा कमी ठेवण्यास दह्याचे सेवन उपयुक्त ठरते.

त्वचेसाठी गुणकारी : दह्यात व्हिटॅमिन 'ई' आणि झिंक असल्याने याचा वापर घरगुती फेस पॅकच्या स्वरूपात त्वचेवर करता येऊ शकतो.

डँड्रफ : दह्यात लॅक्टिक अ‍ॅसिड असल्याने दह्यातील अँटी फंगल विशेषत्वे डँड्रफवर मात करण्यास मदत करतात.

वजन कमी करणे : सर्वात महत्त्वाचा फायदा. हल्ली अनेकजण वाढत्या वजनाच्या त्रासाने ग्रासलेले असतात. दह्यातील कॅल्शिअम शरीरातील कोर्टिसोलची मात्रा वाढू देत नाही. शरीरातील कोर्टिसोल हार्मोनल इंबॅलन्स, जाडेपणा आणि कॉलेस्ट्रॉलच्या वाढीचे कारण आहे.

दह्यामुळे प्रतिकारशक्तीत वाढ : दह्यात असलेले उत्तम प्रतीचे बॅक्टेरिया रोगांशी लढण्याची शक्ती वाढवतात. स्त्रियांमध्ये आढळणाऱ्या व्हजायनल यीस्ट इन्फेक्शनपासून देखील बचाव करण्यास मदत करतात.



# मधुमेहींसाठी 'ही' फळे ठरतील फायदेशीर!



**आजकाल** मधुमेह हा आजार अगदी सामान्य झालेला आहे. बदललेली जीवनशैली, अपुरी झोप, ताणतणाव, व्यायामाचा अभाव यासारख्या अनेक बदलांमुळे मधुमेह होण्याचे प्रमाण वाढत आहे. मधुमेह झाल्यानंतर खाण्यावर अनेक बंधन येतात. त्यातच मधुमेहींमध्ये अनेकदा काय खावं आणि काय खाऊ नये याविषयी समज-गैरसमज निर्माण होत असतात.

त्यातच फळांमध्ये नैसर्गिक साखरेचं प्रमाण अधिक असतं या कारणामुळे अनेक मधुमेही फळांचं सेवन करण टाळतात. मात्र फळांमध्ये जरी साखरेचं प्रमाण असलं, तरी काही फळं ही अशी आहेत, जी मधुमेहींसाठी उपयुक्त ठरतात. चला तर जाणून घेऊयात कोणती आहेत ही फळं -

**पीच :** पीच या फळामध्ये १.६ ग्रॅम फायबरचं प्रमाण असतं. फायबरमध्ये रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रणात आणण्याची क्षमता असते. त्यामुळे पीच हे फळ मधुमेहींसाठी अत्यंत उपयुक्त आहे.

**संत्री :** गोड, आंबट अशी चव असलेल्या संत्र्यांना मधुमेहींसाठी सुपरफूड मानलं जातं. संत्र्यामध्ये व्हिटॅमिन सी आणि फायबर्स असतात. त्यामुळे ब्लड ग्लुकोजचे प्रमाण कमी होते आणि इन्सुलिनचे प्रमाण वाढते.

**किवी :** किवीमध्ये व्हिटॅमिन ए आणि सी सारखे अँटीऑक्सिडेंट्सचे प्रमाण भरपूर असते. त्यासोबतच किवीच्या सेवनामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रणात राहण्यास मदत होते.

**सफरचंद :** मधुमेहींसाठी आवश्यक असणारं फळ म्हणजे सफरचंद. यामध्ये सोल्युब आणि इंसोल्यूब हे दोन्ही फायबर्स भरपूर प्रमाणात असतात.

**पेरू :** पेरूमध्ये ग्यायसेमिक इंडेक्स कमी असून व्हिटॅमिन सी, फायबर्स आणि अँटीऑक्सिडेंट्स भरपूर प्रमाणात असतात.

# हृदयरुग्णांसाठी राईस ब्रॅन ऑईल



**भारतात** भुईमूग, सोयाबीन, मोहरी आणि खोबरेल तेलाचे सेवन सर्वश्रुत आहे. या तेलांचे आरोग्याच्या दृष्टीने कमी-अधिक फायदे आहेत. आतापर्यंत खाद्यतेलाची निवड त्यांच्या किमतीवर केली जायची, परंतु हृदयरुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता खाद्यतेल निवडीबाबत ग्राहक आता चोखंदळ झाले आहेत. नवीन संशोधनानुसार सर्वाधिक निरोगी आणि हृदयाच्या आरोग्याला उपयुक्त खाद्यतेल म्हणून राइस ब्रॅन ऑईल ओळखले जाते. हे तेल भाताच्या कोंड्यापासून तयार केले जाते. अमेरिकेत तसेच अनेक आशियाई देशांमध्ये निरोगी तेल म्हणून राईस ब्रॅन विकले जाते.

कोलेस्टेरॉलची पातळी योग्य तितकी राखण्यासाठी आणि हृदयविकार व अन्य आजार रोखण्यासाठी या खाद्यतेलाचा वापर जागतिक आरोग्य संघटनेनेही सुचवला आहे. आरोग्यविषयक वाढत्या जागरुकतेमुळे लोक ऑलिव्ह ऑईल आणि कॅनोला तेलाला पसंती देताना दिसतात. परंतु या महागड्या आणि आयात होणाऱ्या ऑलिव्ह आणि कॅनोला ऑईलला किफायतशीर भारतीय पर्याय म्हणून राईस ब्रॅन ऑईल हळूहळू लोकांच्या पसंतीस उतरत आहे. भाताच्या उत्पादनात जगात चीनपाठोपाठ भारत हा दुसरा मोठा देश असला तरी सध्या सुमार १० लाख टन इतकेच राईस ब्रॅन तेल उत्पादित होते तर भारतातील वार्षिक खाद्यतेलाचा उपभोग हा एक कोटी २० लाख टन असून त्या तुलनेत उत्पादित राईस ब्रॅन तेलाचे प्रमाण जेमतेम पाच टक्के आहे. भारतात भाताच्या कोंड्याची प्रचंड उपलब्धता असली तरी हा भात कोंडा वीट भट्ट्यांमध्ये जळणासाठी आणि पशुखाद्य म्हणूनच वाया घालवला जातो. सध्या देशात अदानी विल्मर, मॅरिको, राईसेला यासह विविध नऊ उत्पादकांचे राईस ब्रॅन तेलाचे ब्रँड्स उपलब्ध आहेत. हे तेल आरोग्याच्या दृष्टीने उपयुक्त आहेच, पण त्यासोबत स्वयंपाकाच्या दृष्टीनेही उपयुक्त आहे. कारण २१७ अंश सेल्सियस तापमानापर्यंत तापलेल्या राईस ब्रॅन तेलात नैसर्गिक पोषणमूल्ये आणि अँटी ऑक्सिडंट्सचे प्रमाण अबाधित राहते. त्यामुळे या तेलावर प्रक्रिया करून तयार होणाऱ्या पदार्थांमध्ये पोषणमूल्य कायम राहतात.

# एक-दोन नव्हे तर 'पारु' फेम प्रसाद जवादेने कमी केलं तब्बल २८ किलो वजन

झी मराठीवर नुकत्याच सुरू झालेल्या पारु या मालिकेत अभिनेता प्रसाद जवादे प्रमुख भूमिका साकारत आहे. माझिया प्रियाला प्रीत कळेना या गाजलेल्या मालिकेमुळे अभिनेता घराघरांत लोकप्रिय झाला. पुढे, त्याने बिग बॉसमराठीमध्ये सहभाग घेतला होता. छोट्या पडद्यावर यश मिळाल्यावर वैयक्तिक आयुष्यात गेल्यावर्षी नोव्हेंबर महिन्यात प्रसादने अमृता देशमुखशी लग्नगाठ बांधली.प्रसाद आणि अमृताची जोडी प्रेक्षकांमध्ये प्रचंड लोकप्रिय आहे. लग्नानंतर दोघांनीही आता पुन्हा कामाला सुरुवात केली आहे. प्रसाद पारु मालिकेत मुख्य भूमिका साकारत असून, अमृता सध्या रंगभूमीवर आपल्या अभिनयाचा ठसा उमटवताना दिसत आहे. गेली वर्षभर प्रसादने स्वतःवर भरपूर मेहनत घेतली. त्याने जवळपास २८ किलो वजन कमी केलं. टीव्ही ९ मराठीशी संवाद साधताना अभिनेत्याने याबद्दल खुलासा केला आहे.प्रसाद म्हणाला, ह्लएक वर्षाआधी माझं वेळापत्रक निश्चित नव्हतं. मी हवं तसं वागायचो. पण, कालातरांने ही जीवनशैली चुकीची असल्याची जाणीव मला झाली. वेळेत खाणं, झोपणं आणि व्यायाम करणं ही सगळी शिस्त मी स्वतःला लावली. माज्या शरीरात हळुहळू बदल जाणवू लागला. या सगळ्याचा फायदा मी सध्या साकारत असलेल्या आदित्य किर्लोस्करच्या भूमिकेसाठी मला झाला.प्रसाद पुढे म्हणाला, मला जीमला रोज जाता येत नाही. त्यामुळे मी घरी व्यायाम करतो. यासाठी ट्रेनर मला ऑनलाइन मदत करतो. अर्धा-पाऊण तास वेळ मिळाला, तर मी आवर्जून धावायला जातो. प्राणायाम करतोड्ढआठवड्यातून चार दिवस तरी हे वेळापत्रक मी काटाक्षाने पाळतो यामुळे माझं २८ किलो वजन कमी झालं आहे.मी आता रोज ४ लिटर तरी पाणी पितो. पाण्यासाठी माझी दोन लिटरची खास बॉटल आहे. वरण-भात, भाजी, पोळी असा संपूर्ण आहार मी घेतो. या सगळ्यात गोड खाण्यावर माझं नियंत्रण असतं. तुम्हाला फिट राहायचं असेल आणि वेळ मिळत नसेल तर, दिवसातून एकदा तरी चालायला जा. यामुळे शरीरातील अनेक व्याधी दूर होतात. या सगळ्या मेहनतीचं फळ मला आदित्य किर्लोस्करची भूमिका साकारताना मिळालं. पहिल्याच प्रोमोमध्ये मी फिट दिसत होतो त्यामुळे मलाही तो प्रोमो पाहून आनंद झाला. असं प्रसादने सांगितलं.




## दिनविशेष

### ३ मार्च

- १८४५: फ्लोरिडा हे अमेरिकेचे २७ वे राज्य बनले.
- १८६५: हाँगकाँग अँड शांघाय बँकिंग कार्पोरेशन (ल्ठइउ) ची स्थापना झाली.
- १८८५: अमेरिकन टेलिफोन अँड टेलिग्राफ कंपनी (अळ&ळ) ची स्थापना झाली.
- १९२३: टाईम मॅगझिनचे पहिले मासिक प्रकाशित झाले.
- १९३०: नाशिक येथील कला राम मंदिरात सर्वांना प्रवेश मिळण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सत्याग्रह केला.
- १९३८: सौदी अरेबिया मध्ये खनिज तेलाचा शोध लागला.
- १९३९: महात्मा गांधी यांनी ब्रिटिश सरकारच्या हुकूमशाही नियमा विरुद्ध मुंबईमध्ये येथे उपोषण सुरू केले.
- १९४३: दुसरे महायुद्ध झ लंडनमधे बॉम्बविरोधी आश्रयस्थानात घुसताना झालेल्या चेंगराचेंगरीत १४३ ठार.
- १९६६: डॉ. धनंजयराव गाडगीळ पुणे विद्यापीठाचे ६वे कुलगुरू झाले.
- १९७३: भारताच्या ओडिशा राज्यात राष्ट्रपती राजवट लागू.
- १९८६: ऑस्ट्रेलिया कायदा १९८६ प्रमाणे, ऑस्ट्रेलिया देश युनायटेड किंगडम पासुन पूर्णपणे स्वतंत्र झाला.
- १९९४: जयपूर येथील गिटारवादक पंडित विश्वमोहन भट यांना ग्रॅमी पुरस्कार प्रदान केला.
- २००३: महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे देण्यात येणाया शरच्चंद्र चटोपाध्याय पुरस्कारासाठी ज्येष्ठ लेखिका डॉ. सरोजिनी वैद्य यांची निवड झाली.
- २००५: स्टीव्ह फॉसेट यांनी ग्लोबल फायर या विमानातून एकट्याने आणि परत इंधन न भरता ६७ तासांत पृथ्वीप्रदक्षिणा पूर्ण केली.
- २०१५: २० डिसेंबर २०१३ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाने ३ मार्च हा जागतिक वन्यजीव दिन म्हणून साजरा करण्याची घोषणा केली.
- १८३९: टाटा उद्योग समुहाचे संस्थापक भारतीय उद्योगपती जमशेदजी टाटा यांचा जन्म. (मृत्यू: १९ मे १९०४)
- १८४५: जर्मन गणितज्ञ जॉर्ज कँटर यांचा जन्म. (मृत्यू: ६ जानेवारी १९१८)
- १८४७: टेलिफोनचा जनक अ‍ॅलेक्झांडर ग्राहम बेल यांचा जन्म. (मृत्यू: २ ऑगस्ट १९२२)

## भविष्य

**मेष** कामावर अधिक लक्ष केन्द्रित करावे. समोरील प्रत्येक गोष्टीत रस घ्याल. उत्तम वैवाहिक सौख्य लाभेल. विषय वासना वाढू शकते.

**वृषभ** दिवस घाईगडबडीत जाईल. खिलाडु वृत्तीने वागाल. मित्रांशी पैज लावाल. बुद्धिकौशल्याने कामे करण्याकडे कल राहील.

**मिथुन** कौटुंबिक सौख्याकडे लक्ष द्यावे. बागबगीच्याच्या कामात गुंग व्हाल. समोरील सर्व गोष्टीत आनंद मानाल. घरगुती कामे सुरळीत पार पडतील.

**कर्क** बौद्धिक छंद जोपासाल. स्वभावात काहीसा लहरीपणा येईल. जास्त चौकसपणा दाखवाल. साहित्य प्रेम दर्शवाल. भावंडांच्या सहवासात जुन्या आठवणीत रमाल.

**सिंह** आवडीच्या गोष्टी करण्यावर भर द्यावा. पत्नीशी मनमोकळ्या गप्पा माराल. भागीदारीच्या कामात काही नवीन बदल करावेत. कचेरीच्या कामात वेळ लागू शकतो. सामाजिक संबंध जपावेत.

**कन्या** आपल्या इच्छेला अधिक महत्व द्याल. स्वतःचे म्हणणे खरे कराल. इतरांबद्दल मत बनवण्याआधी सारासार विचार करावा. घरगुती प्रसंग शांतपणे हाताळावेत.

**तुला** मानसिक चंचलता जाणवेल. उगाचच नसत्या काळज्या करत बसाल. ध्यानधारणा करण्याकडे लक्ष द्यावे. हातातील अधिकाराची जाणीव ठेवावी. आर्थिक उलाढाल सावधगिरीने

**वृश्चिक** व्यावसायिक लाभ सुनिश्चित करावा. मित्रांचे सहकार्य मिळेल. वरिष्ठांना खुश करता येईल. व्यापारी वर्ग अपेक्षित लाभाने समाधानी राहील. मनातील इच्छा पूर्ण होईल.

**धनु** कामाची वेळेनुसार छानणी करावी लागेल. जबाबदारी लक्षात घेऊन वागावे. राग आवरता घ्यावा लागेल. कोणतेही धाडस करतांना सावधानता बाळगावी. प्रवासात काळजी घ्यावी.

**मकर** धार्मिक स्थळांना भेट द्याल. तात्विक विचार मांडाल. गुरूजनांचा आशीर्वाद मिळवाल. थोर व्यक्तींविषयी आदर व्यक्त कराल. क्षमाशीलतेने वागाल.काही कामे फार कष्ट न घेता पार पडतील.

**कुंभ** दिवसभर कामाचा ताण राहील. बौद्धिक ताण जाणवेल. मित्रांशी वादाचे प्रसंग येऊ शकतात. इतरांच्या मताचा विचार करावा. योग्य संधीची वाट पहावी.

**मीन** बदलीची चिन्हे दिसतील. तुमच्या कार्यपद्धतीचे कौतुक केले जाईल. कामात उर्जितावस्था येईल. वैचारिक सुसूत्रता ठेवावी. जोडीदाराचा हट्ट पूर्ण कराल.

## दै. लोकरक्षणाय सुडोकू - २२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | | | 9 | | | | 5 | |
| | | 1 | | | | | 7 | 3 |
| | 9 | | 1 | | 6 | 8 | | 4 |
| | | | 2 | 4 | | | | |
| 3 | | 2 | | | | 6 | 1 | |
| 5 | 7 | 9 | 6 | | | 3 | | |
| | 3 | | 7 | 6 | 1 | | | |
| 1 | | | | 2 | | | | |
| | 6 | 5 | | | 4 | 7 | | |

## उत्तर सुडोकू -२१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 4 | 2 | 3 | 1 | 5 | 6 | 8 | 9 |
| 1 | 9 | 3 | 8 | 4 | 6 | 2 | 7 | 5 |
| 8 | 5 | 6 | 7 | 9 | 2 | 4 | 3 | 1 |
| 4 | 6 | 7 | 2 | 5 | 1 | 3 | 9 | 8 |
| 2 | 3 | 5 | 9 | 6 | 8 | 1 | 4 | 7 |
| 9 | 8 | 1 | 4 | 3 | 7 | 5 | 6 | 2 |
| 6 | 2 | 9 | 1 | 8 | 3 | 7 | 5 | 4 |
| 3 | 7 | 4 | 5 | 2 | 9 | 8 | 1 | 6 |
| 5 | 1 | 8 | 6 | 7 | 4 | 9 | 2 | 3 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## संपादकीय

# ‘एआय’बाबतची भीती अनाठायी

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) ही मानवासाठी कशी घातक आहे, याबाबत सध्या शेकडो लेख लिहिले जात आहेत. ही भीती अनाठायी आहे. त्याला तशीच काही भौतिक आणि तात्त्विक कारणेही आहेत. त्याचा परामर्श घेण्याचा प्रयत्न करूया! एआय मुळे अनेक लोकांच्या नोकऱ्या जातील, ज्यामुळे जागतिक स्तरावर मनुष्यबळाचे गणित कोलमडू शकते, अशी भीती व्यक्त केली जाते.दुसरी भीती म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून चुकीची माहिती निर्माण करून प्रसारित करता येऊ शकते. यातून समाजामध्ये तणावाचे वातावरण निर्माण होऊ शकते. त्याचप्रमाणे कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे वास्तवाच्या आणि आभासी जगाच्या सीमा अत्यंत धूसर होतील. सर्वात महत्त्वाची भीती म्हणजे यातून मानवाप्रमाणे संवेदना असणाऱ्या यंत्रांची निर्मिती होण्याची शक्यता आहे. यामध्ये काही गडबड झाल्यास समस्त मानवजातीला प्रचंड मोठा धोका निर्माण होऊ शकतो. जेव्हा कोणतेही नवीन तंत्रज्ञान येते तेव्हा ते तात्पुरत्या स्वरुपात आणि काही अंशी सुरळीत असणाऱ्या प्रक्रियेमध्ये उलथापालथ घडवून आणते. परंतु काळाच्या ओघात त्यावर पुरेसे काम होऊन संबंधित तंत्रज्ञानामुळे निर्माण झालेली अस्थिरता दूर होऊन पुन्हा सर्व स्थिरस्थावर होते. नोकऱ्या जाण्याची जी भीती व्यक्त होते त्याबाबतही वरील तत्त्व लागू होणारे आहे. याउलट कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे कोड क्रिएटर या स्वरुपाचे काम करण्यासाठी मोठ्या प्रमाणात नोकरीच्या संधी उपलब्ध होतील. सॉफ्टवेअर तयार करणे आणि एआय च्या जमान्यात बनावट आणि अस्सल यातील फरक शोधून काढणे, हे त्यांचे प्रमुख काम असेल. कारण सध्या अशा पद्धतीने अस्सल आणि नक्कल यांतील फरक ओळख हे सर्वात मोठे आव्हान आहे. अयोग्य व्यक्ती या गोष्टीचा गैरफायदा घेण्याची दाट शक्यता आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचे सामर्थ्य प्रचंड असल्यामुळे मोठ्या प्रमाणात कोड क्रिएटरची आवश्यकता भासणार आहे. विशेष म्हणजे, यापासून कोणतेही कार्यक्षेत्र अलिप्त राहू शकणार नाही. मग ते मौखिक किंवा श्राव्य असो, मुद्रित असो अथवा दृकश्राव्य स्वरुपाचे असो. या सर्व क्षेत्रातील कामांसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर आणि या सर्व क्षेत्रांत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून फसवेगिरी रोखण्यासाठी मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाची आवश्यकता भासणार आहे. हीच स्थिती ऑटोमेशन अर्थात स्वयंचलित यंत्र उद्योगांबाबतही होणार आहे. या क्षेत्रातही कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करत यंत्र आणि मनुष्यबळ यांचा सुयोग्य मेळ बसविणाऱ्या आणि मानवी समूहाच्या विकासासाठी अधिक तत्पर असणाऱ्या सर्जनशील अभियंत्यांची मोठी गरज भासेल. वर्तमानातही ज्या कंपन्यांमध्ये उत्पादनासाठी अथवा अन्य प्रक्रियेसाठी यंत्रमानवावरील अवलंबित्व खूप जास्त आहे, तेथेही प्रोग्रॅमिंग, त्याचप्रमाणे देखभाल-दुरुस्तीसाठी मोठे मनुष्यबळ आहे. काही मोठ्या कंपन्या नफा वाढवण्यासाठी मनुष्यबळात कपात करण्याची शक्यता निर्माण झाली तरीही त्यांना त्यांच्या कारखान्यातील यंत्रणा अथवा कार्यालयातील काम सुरळीतपणे चालावे यासाठी मोठ्या प्रमाणावर कोड रायटर आणि हार्डवेअर इंजिनियरची आवश्यकता भासेल. कृत्रिम बुद्धिमत्ता ही मानवाच्या कल्पक मेंदूतून आलेली संकल्पना आहे. आपण अशा पद्धतीनेच मोठ्या प्रमाणात गणितातील आकडेमोड आणि अन्य असंख्य कामे चुटकीसरशी करण्यासाठी संगणकाची निर्मितीही केली आहे. मात्र कृत्रिम बुद्धिमत्तेचा वेग आणि विस्तार हा त्याच्याही एक पाऊल पुढे असल्याने अधिक भीती उत्पन्न झाली आहे. पण ती अनाठायी वाटते. एवढ्या मोठ्या प्रमाणात जो डाटा संग्रहित होत आहे त्याचे विश्लेषण करण्यासाठी, त्यातून निष्कर्ष काढण्यासाठी किंवा शक्यता वर्तविण्यात मोठ्या प्रमाणात अभियंत्यांची आणि शास्त्रज्ञांची गरज भासणार आहे. यात प्रामुख्याने हवामान बदल, भौगोलिक परिस्थितीतील बदल, यांसह मानवी जीवनातील अनेक बाबतीत होणाऱ्या बदलांचे विश्लेषण कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने करता येणे सोपे होणार आहे. फक्त याचा वापर विधायक कार्यासाठी होणे गरजेचे आहे. २००१ मध्ये प्रदर्शित स्पेस ओडिसी या हॉलिवूडपटात अत्याधुनिक संगणक एचएएल ज्याप्रमाणे कार्य करताना दाखवला आहे, त्याप्रमाणे कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे संवेदना असणाऱ्या यंत्रांच्या निर्मितीची आणि त्यातून मानवी प्रजातीच्या अस्तित्वावर घाला येण्याची भीती व्यक्त होत आहे. ही यंत्रे म्हणजे मानवाप्रमाणे इंद्रियज्ञान असणारी, बाह्य ज्ञानाचे आकलन करून त्यावर प्रतिक्रिया व्यक्त करणारी यंत्रप्रणाली. मात्र काहींना या यंत्रांच्या निर्मितीमध्ये, ती यंत्रे सजीवाप्रमाणे भासण्याची आणि काळाच्या प्रवाहात मानवाप्रमाणे विकसित होत जाण्याची भीती वाटते. परंतु ती अगदीच निरर्थक आहे. त्याची कारणे अशी: कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने निर्माण करण्यात आलेल्या या यंत्रामध्ये भावभावना आणि सहानुभूती अथवा राग-द्वेष असणार नाही. या यंत्रांच्या माध्यमातून केवळ मोठ्या संख्यांची आकडेवारी आणि त्यांचे विश्लेषण होणार आहे. बाहेरून मिळालेल्या माहितीवर अथवा आकडेवारीवर विचार करणे आणि त्यावर प्रतिक्रिया देणे इतपतच हा विकास होणार आहे. या यंत्रांना कोणतेही ध्येय अथवा भावना असणार नाहीत. त्यामुळे मनुष्य कायम वरचढ ठरणार आहे. प्राचीन कथांमध्ये वर्णन केलेल्या प्रचंड शक्ती आणि काम करू शकणाऱ्या, परंतु कोणतीही भावना अथवा राग-द्वेष नसणाऱ्या प्राण्यांप्रमाणे कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून तयार करण्यात आलेली यंत्रे कार्य करतील.सध्या कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर चॅट जीपीटी अथवा गुगल यांच्या माध्यमातून केला जात असून, याच्या वापराचे स्वरुप हे प्रामुख्याने विविध विषयांची माहिती मिळवणे एवढेच आहे. त्यातही योग्य प्रश्नांचा वापर न केल्यास या माध्यमातून मिळणारी माहितीही चुकीची ठरते. कृत्रिम बुद्धिमत्तेची सर्व यंत्रणा ही प्रोसेसर आणि सर्व्हरवर अवलंबून आहे. हे सर्व सर्व्हर ऑप्टिकल फायबर आणि वायरद्वारे टॉवरला किंवा सेकंडरी प्रोसेसरला जोडलेले आहेत. त्यामुळे मानवाप्रमाणे यामध्ये संवेदना निर्माण होण्याला आणि त्यातून काही कार्य करण्याला मर्यादा आहेत. कारण माणसाचा मेंदू हा अशा पद्धतीने कोणत्याही वायर अथवा ऑप्टिकल फायबरने कुठेही जोडलेला नाही.

# एका ‘कविते’च्या मृत्यूचे कवित्व..






एकीकडे जगातली तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनण्याकडे आपला प्रवास सुरू असल्याच्या गमजा आपण मारत आहोत. पण दुसरीकडे आपण दुर्गम भागात राहणाऱ्या एका गर्भवतीला सुलभ प्रसूतीची हमी देऊ शकत नाही, त्यासाठीची तत्पर यंत्रणा उभी करू शकत नाही, आणि त्यामुळे तिचा करुण अंत होतो, हे पुढे आलेले चित्र केवळ क्लेशदायकच नाही, तर कल्याणकारी राज्य या आपल्या व्यवस्थेच्या स्वरूपाच्या चिंधड्या उडवणारे आहे. पण ज्यांनी या व्यवस्थेच्या साहाय्याने सगळ्यात शेवटच्या माणसापर्यंत सगळ्या सुविधा पोहोचवायच्या, तेच पराकोटीच्या आत्मकेंद्री, संकुचित आणि खोकेबाज राजकारणात अडकले असतील तर सामान्य माणसाचे यापेक्षा वेगळे ते काय होणार? नंदुरबार जिल्ह्यातल्या कवितेचे हकनाक जाणे हे खरे तर या व्यवस्थेतील अव्यवस्थेच्या हिमनगाचे टोक.. अगदी राज्याच्या राजधानीपासून दीडदोनशे किलोमीटरवरच्या एखाद्या जिल्ह्यातही यापेक्षा फार वेगळे चित्र असेल असे नाही. आरोग्य, शिक्षण यांसारखी महत्त्वाची क्षेत्रे ऑप्शन ला टाकल्यावर खरेतर ऱ्हासाशिवाय कशाचीच गॅरंटी देता येत नाही. एका मातेला ती मृत्यूच्या रूपात मिळाली.

कविता राऊत तिचे नाव. नंदुरबार जिल्ह्यातल्या अक्कलकुवा तालुक्यातल्या अतिदुर्गम बडीपाडयाच्या या गर्भवतीचे दिवस भरले आणि प्रसूतिवेणा सुरू झाल्या. वेळ रात्रीची. तिला जवळच्या प्रथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले. तिथे नेहमीप्रमाणे वैद्यकीय अधिकारी नसल्यामुळे ग्रामीण रुग्णालयाकडे धाडण्यात आले. त्यासाठी रुग्णवाहिकाही देण्यात आली. पण ही परवड कमी म्हणून की काय ती रुग्णवाहिका वाटेतच बंद पडली आणि तिच्यातच अर्ध्या वाटेत कविताची प्रसूती झाली. त्याबरोबरच तिची प्रकृतीही खालावली. थोडया वेळाने आलेल्या दुसऱ्या रुग्णवाहिकेने तिला ग्रामीण रुग्णालयात नेले खरे; पण तिथे आवश्यक सुविधा नसल्यामुळे तिला जिल्हा रुग्णालयात नेण्यासाठी सांगण्यात आले. जिल्हा रुग्णालयात पोहोचेपर्यंत या मातेने जीव गमावला. आरोग्य व्यवस्था कशी नसावी याचे हे उदाहरण आहे, त्यामुळे ते एकटेदुकटे म्हणून दुर्लक्षित करता येत नाही. विकसित देशांमध्ये अशा उदाहरणांकडे खुंटी हलवून बळकट करण्याची संधी म्हणून बघितले जाते. पुन्हा असे होऊ नये यासाठीचा तो धडा असतो. पण आपल्याकडे खालचे नाइलाजाने आणि वरचे गरज म्हणून असे खालपासून वपर्यंत सगळेचजण जणू रामभरोसे कसे जगतात, याचे गंभीर प्रातिनिधिक चित्र या प्रकरणातून उभे राहते.

प्रातिनिधिक यासाठी की आरोग्य अधिकारी जागेवर नसणे, रुग्णवाहिका वाटेतच बंद पडणे, एका यंत्रणेने दुसऱ्या यंत्रणेकडे बोट दाखवणे या सगळ्या गोष्टी एकाच वेळी घडणे हा खचितच योगायोग नव्हे. आपल्या उत्तरदायित्वाबाबतची, कर्तव्याबाबतची अनास्था, निष्काळजीपणा, बेफिकिरी या सगळ्याच्या मिलाफातून हे घडले आहे, यात शंका नाही. कारण कविताच्या गावाजवळच्या पिंपळखुटा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी राज्य सरकारने दिलेली रुग्णवाहिका गेले सहा महिने धुळयात धूळ खात पडून आहे म्हणे. ती बंद पडली म्हणून दिलेली पयार्यी रुग्णवाहिकाही सतत नादुरुस्त होत असल्याच्या तक्रारी केल्या गेल्या. या भागातल्या आमदारांनीही त्यांच्या भागातल्या आरोग्य समस्यांच्या तक्रारी विधान परिषदेत मांडल्या. पण या सगळ्याचे पुढे काहीच झाले नाही आणि त्यातून निर्माण झालेल्या समस्यांच्या चक्रव्यूहात कविता राऊतचा बळी गेला. वास्तविक आजच्या काळात संपर्क यंत्रणा अत्यंत सुलभ आहे. गावातील अंगणवाडी ताईकडे गावातील सगळ्या गर्भवती स्त्रियांची माहिती उपलब्ध असते. त्यामुळे एखाद्या अगदी दुर्गम भागातील गावातील गर्भवतीचे दिवस भरणे आणि तिला अशा सुविधांची गरज लागू शकते, हे माहीत असणे यासाठी कोणत्याही रॉकेट सायन्स ची गरज नाही. त्यासाठी फक्त गरज आहे ती इच्छाशक्तीची.

आणि आरोग्यासारख्या अत्यंत महत्त्वाच्या व्यवस्थेत आज वरपासून खालपर्यंत तिचाच अभाव आहे. या अभावाची कर्मकहाणी अगदी आरोग्य यंत्रणेसाठीच्या अर्थसंकल्पातील तरतुदीपासून सुरू होते. उपलब्ध आकडेवारीनुसार २०१० ते २०२० या दशकभराच्या काळात सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवर आपण आपल्या सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या १.१२ ते १.३५ टक्के एवढाच खर्च केला. तर अमेरिकेचा २०२२ चा सार्वजनिक आरोग्यावरचा खर्च १६.६ टक्के, जर्मनीचा १२.७ टक्के आणि फ्रान्सचा १२.१ टक्के होता. आपल्याला आपली अर्थव्यवस्था या विकसित देशांच्या अर्थव्यवस्थांच्या बरोबरीला नेऊन ठेवायची असेल, (अमेरिका, चीनच्या अर्थव्यवस्थांचा आकार पाहता ते कसे मिथक आहे, ही गोष्ट वेगळी) तर आरोग्य, शिक्षण या मानकांमध्ये मागे राहून कसे चालेल? वेळेवर वाहन उपलब्ध झाले नाही, वैद्यकीय सेवा उपलब्ध झाली नाही म्हणून एखाद्या गर्भवतीचा मृत्यू होणे हे प्रगत अर्थव्यवस्थेत नामुष्कीचे नाही का? जी गोष्ट आरोग्यविषयक तरतुदीबाबत तीच डॉक्टरांच्या उपलब्धतेबाबत. जागतिक आरोग्य संघटनेच्या मानकांनुसार दर एक हजार लोकसंख्येमागे एक डॉक्टर असणे अपेक्षित आहे. त्यानुसार आपल्या एकूण लोकसंख्येसाठी १३ लाख ६० हजार डॉक्टर उपलब्ध असणे आवश्यक आहे. पण आपण अद्याप तो आकडा गाठू शकलेलो नाही. डॉक्टर झालेल्या तरुण-तरुणींना ग्रामीण भागात अजिबात जायचे नसते, ही आणखी एक समस्या. त्याची कारणेही आणखी वेगळी आणि शिक्षणव्यवस्थेतील समस्या हग्गोचर करणारी आहेत. याशिवाय सगळ्याच व्यवस्थांप्रमाणे आरोग्य व्यवस्थेतही गुंतलेले वेगवेगळ्या प्रकारचे हितसंबंध सर्वसामान्यांचे जगणे आणखी अवघड आणि गुंतागुंतीचे करतात. साध्या बॅण्डेजपासून ते महागडया औषधांपर्यंतच्या खरेदीत हे हितसंबंध काम करतात, असे सांगितले जाते. शहरात असो की ग्रामीण भागात, कोणत्याही सरकारी आरोग्य यंत्रणेकडे सर्वसामान्य माणूस शेवटचा पर्याय म्हणून बघतो किंवा म्हणून का जातो, ते कोणत्याही वर्तमानपत्रांमधील चारदोन दिवसांच्या बातम्या वाचल्या की सहज कळून चुकते. एकीकडे अनेक सरकारी रुग्णालयांमध्ये महत्त्वाची उपकरणे नसतात, आणि दुसरीकडे अनेक सरकारी रुग्णालयांमध्ये असलेली अत्यंत महत्त्वाची उपकरणे धूळ खात किंवा गंजत पडलेली असतात. या सगळ्यामध्ये अपवाद आहेत, पण ते नियम सिद्ध करण्यापुरतेच. अनेकदा रुग्णांना हवी असलेली औषधे उपलब्ध नसतात, अनेकदा त्यांच्यावरची तारीख उलटून गेलेली असते. शहरांमधली, जिल्हा पातळीवरची रुग्णालये तुडुंब भरलेली असतात. त्यांच्यावर सातत्याने एवढा ताण असतो की ती चालतात कशी, याचेच आश्चर्य वाटावे. एकीकडे गरिबीत जगणारी प्रचंड लोकसंख्या, तिच्या तुलनेत प्रशिक्षित डॉक्टरांसह सर्व प्रकारच्या आरोग्य सुविधांचा तुटवडा आणि दुसरीकडे शहरांमध्ये सुपरस्पेशालिटी हॉस्पिटले (अर्थात तीही गरजेचीच आहेत) आणि सुपरस्पेशालिटी डॉक्टर्स (आणि तेही गरजेचेच) असे आपल्या सध्याच्या आरोग्यव्यवस्थेचे चित्र आहे. म्हणजे एकीकडे लोकसंख्येच्या तुलनेत कमी संख्येने का होईना, पण सगळ्याच शाखांमधील अत्यंत तज्ज्ञ डॉक्टर्स उपलब्ध आहेत आणि दुसरीकडे व्यवस्थेतील सुविधांचा अभाव यासारख्या कारणामुळे मृत्यू हा गंभीर विरोधाभास आहे. राज्यातील मातामृत्यूंचे प्रमाण गेल्या २० वर्षांत कमी झाल्याचे आकडेवारी सांगते. पण अशा पद्धतीचा एक मृत्यूदेखील गांभीर्यानेच घेतला गेला पाहिजे. चार वर्षांत जगातील महाधनिकांची म्हणजेच किमान तीन कोटी डॉलर्स एवढी संपत्ती असलेल्यांची सर्वाधिक संख्या भारतात असेल, पण हा प्रश्न आर्थिक स्थितीलाच नाही, तर आरोग्य व्यवस्थेलाही लागू होतो. कविता राऊत तर गेली. पण आपल्या आरोग्यव्यवस्थेचे कवित्व सरणार कधी, हा प्रश्न वारंवार विचारावा लागेल.

# मलनिस्सारण जलवाहिन्यांचे होणार मजबुतीकरण

■ ९०० मिमी व्यासाच्या नवीन वाहिन्या टाकणार ■ पालिका ६०० कोटी रुपये खर्च करणार

**मुंबई :** मुंबईचा विकास झपाट्याने होत असून, मूलभूत सुविधा वाढवण्यावर पालिका प्रशासनाने भर दिला आहे. मुंबईत सुमारे २ हजार २६ किलोमीटर लांबीचे मलनिस्सारण वाहिन्यांचे जाळे आहे. बहुतांशी मलनिस्सारण जलवाहिन्या जुन्या झाल्या आहेत. या वाहिन्यांचे जाळे विस्तारण्यासह मजबुतीकरण केले जाणार आहे. यासाठी अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला आहे. मुंबई महापालिका यासाठी तब्बल ६०० कोटी रुपये खर्च करणार आहे. मलनिस्सारण प्रचलन विभागामार्फत शहर आणि उपनगरात २२५ ते ९०० मिमी व्यासाच्या मलनिस्सारण वाहिन्या नव्याने टाकल्या जाणार आहेत. तसेच नवीन मलनिस्सारण वाहिन्यांची जोडणी, एकत्रीकरण अशा विविध स्वरूपाची कामे केली जाणार आहेत.

मुंबईतील बहुतांश मलनिस्सारण वाहिन्या ब्रिटिशकालीन असून, त्या जीर्ण झाल्या आहेत. जीर्ण झालेल्या मलनिस्सारण वाहिन्या बदलत



नवीन टाकण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या वाहिन्यांचे मजबुतीकरण केले जाणार आहे. पालिकेच्या या प्रकल्पामुळे मुंबईतील मलनिस्सारण समस्येचे निराकरण होण्यास मदत होईल तसेच मलवाहिनी व्यवस्थेने नागरिकांचे दैनंदिन जनजीवन आरोग्यदायी बनण्यास मदत होईल, असा विश्वास मलनिस्सारण विभागाच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

जुलै २०१९ मध्ये मुंबईत कालबद्ध पद्धतीने मलनिस्सारण वाहिन्यांचे जाळे वाढण्यासंदर्भात उच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत. न्यायालयाच्या आदेशानुसार, पालिकेने मलवाहिन्यांच्या जाळ्यांचा विस्तार करण्यावर भर दिला आहे. त्यामुळे येत्या काळात जलवाहिन्यांचे जाळे विस्तारणार असल्याचे सांगण्यात आले.

### कुठे, किती कामे

- खंदकरहित तंत्रज्ञानाद्वारे ६०० मिमी ते ९०० मिमी व्यासाच्या मलवाहिन्यांचे पुनर्वसन - ६३ कोटी ५१ लाख ९ हजार
- शहर व उपनगरातील खंदकरहित तंत्रज्ञानाद्वारा मनुष्य-प्रवेश मलवाहिन्यांचे पुनर्वसन - १६९ कोटी ८३ लाख १९ हजार
- पश्चिम उपनगरातील तंत्रज्ञानाद्वारे मनुष्य-प्रवेश मलवाहिन्यांचे पुनर्वसन - १४३ कोटी १० लाख ७२ हजार
- परिमंडळ १ व २ तंत्रज्ञानाद्वारा २२५ मिमी ते ३०० मिमी व्यासाच्या मलवाहिन्यांचे पुनर्वसन - ४५ कोटी ३ लाख १४ हजार
- परिमंडळ ३ तंत्रज्ञानाद्वारा २२५ मिमी ते ३०० मिमी व्यासाच्या मलवाहिन्यांचे पुनर्वसन -४५ कोटी ३ लाख १४ हजार
- परिमंडळ ४ तंत्रज्ञानाद्वारा २२५ मिमी ते ३०० मिमी व्यासाच्या मलवाहिन्यांचे पुनर्वसन - ४५ कोटी ३ लाख १४ हजार
- परिमंडळ ५ तंत्रज्ञानाद्वारा २२५ मिमी ते ३०० मिमी व्यासाच्या मलवाहिन्यांचे पुनर्वसन -४५ कोटी ३ लाख १४ हजार
- परिमंडळ ६ तंत्रज्ञानाद्वारा २२५ मिमी ते ३०० मिमी व्यासाच्या मलवाहिन्यांचे पुनर्वसन -४५ कोटी ३ लाख ९० हजार

## तरुणीवर अत्याचार करणारा गजाआड

**ठाणे :** वाचनालयात झालेल्या मैत्रीचा वापर करून विविध ठिकाणी फिरण्यास नेत एका २० वर्षीय तरुणीवर अत्याचार केल्याची घटना उघडकीस आलेली आहे. ठाणे नगर पोलीस ठाण्यात तरुणीने तक्रार केल्यानंतर ठाणे नगर पोलिसांनी मंगळवारी तक्रार दाखल करून अजय मोरे (२८) याला अटक केली आहे. अजय भीमराव मोरे खारेगाव येथे वास्तव्यास असला तरी तो मूळ जळगाव जिल्ह्यातील रहिवासी आहे. कळव्यातील एका वाचनालयात त्याची २० वर्षीय तरुणीशी ओळख झाली. ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाल्यानंतर बाहेर फिरण्याच्या बहाण्याने अजय मोरे याने तरुणीला वेगवेगळ्या ठिकाणी नेऊन तिच्यावर अत्याचार केल्याची तक्रार तरुणीने ठाणे नगर पोलीस ठाण्यात दाखल केली.

# Three held for manufacturing gutka, tobacco products in Thane district

**Thane:** Three persons have been arrested for allegedly manufacturing banned gutka and tobacco products in Thane district, police said on Saturday, reported news agency PTI. The accused, Viraj Sitaram Alimkar (24), Mohammad Umar Abdul Rehman (35), and Mohammad Tariq Alikadar Khan (21), were apprehended near Khoni Phata in Dombivili on February 27 for allegedly manufacturing banned gutka and tobacco products in Thane district, senior inspector Naresh Pawar said, reported PTI.



Based on the information provided by the accused, the police raided a farm in Kusavali village and recovered materials and equipment used for manufacturing gutka, he said, reported PTI. The accused were booked under relevant provisions of the Indian Penal Code and Food and Drug Administration Act, and a hunt is on for two others involved in the crime, the official said, reported PTI.

In another incident, in January, the Food and Drug Administration (FDA) has seized banned gutka and tobacco products valued at Rs 12.45 lakh in Thane district of Maharashtra and arrested one person in this connection.

According to the PTI, a team of the FDA along with police raised a premises near a hotel in Bhiwandi area and seized the banned products, the official from Shanti Nagar police station said.

A 34-year-old driver of a tempo parked near the premises was apprehended in this connection.

The police have registered a case under Indian Penal Code sections 328 (causing hurt by means of poison), 273 (sale of noxious food or drink), 272 (adulteration of food or drink intended for sale), 188 (disobedience to order duly promulgated by a public servant), and 179 (refusing to answer public servant authorized to question) and the FDA regulations, the official said, as per the PTI.

Efforts were on to nab four other persons for the involvement in the offence, he said.

The sale and consumption of gutka, scented and flavoured tobacco has been banned in Maharashtra since 2012.

# Two minor sisters seriously injured after school bus runs over them in Maharashtra's Naigaon

**Mumbai:** Two minor sisters were seriously injured after a bus carrying students from St. Augustine's High School, Vasai, crushed them under its wheel in Naigaon West on Friday afternoon.Both sisters, aged five and two, were crossing a road in Amol Nagar colony while holding hands when they were hit by the school bus. The bus stopped after its front right wheel trampled them, leaving them injured. Local residents and passersby heard the commotion of the injured siblings crying for help under the bus. The incident was captured on a CCTV camera installed in the colony. The elder sister, who fractured her right leg in the accident, is recuperating at a hospital in Vasai after surgery.



"A rod has been inserted in her leg. The younger one is surviving with some internal injuries as doctors said that her liver got affected. There are multiple bruises all over their bodies," said Dilshad Ansari, the uncle of the victims. Ansari said, "We live on the ground floor in a structure seen in the CCTV footage, and we have a Kirana shop opposite the house. Both sisters were heading to the Kirana shop but got injured in the accident." The elder sister is recuperating at a hospital in Vasai, whereas the younger one has been referred to a private hospital in Mira Road. "The doctors said that both of them are out of danger," Ansari added. Manikpur police registered an FIR against the driver, who owns the bus. The cops detained him at Manikpur police station and allowed him to go after serving him with a notice to cooperate in the investigation. Sources told mid-day that the bus driver has been financially aiding the minors' family to meet the medical costs.

# Empty train coach catches fire at railway yard in Thane district; no casualties

**Thane:** A coach of an empty train caught fire at railway yard in Thane district in the wee hours of Saturday, an official from the Central Railway (CR) said, reported news agency PTI.The fire at railway yard in Thane district occurred around 1.20 am in the train parked at the railway yard in Badlapur, around 70-80 km from Mumbai, the CR spokesperson said, reported PTI."While the coach was destroyed in the fire, there was no other damage or injury to any person. The Central Railway has ordered a probe by the assistant officers committee," the spokesperson said, reported PTI.

## बोरिवली–विरार नव्या रेल्वे लाईनमुळे ५ गावे बाधित

■ **विरार**, वसई तालुक्यातील उमेळे, उमेलमान, दिवाणमान, माणिकपूर आणि नवघर ही गावे पश्चिम रेल्वेच्या नव्याने टाकण्यात येणाऱ्या विरार-बोरिवली पाचव्या आणि सहाव्या रेल्वे लाईन आणि याडार्मुळे बाधित होणार असल्याचे समोर आले आहेत. यामध्ये जवळपास ७५ वर्षांपूर्वीचे चर्च, १०३ वर्षांपूर्वीचे देऊळ आणि जवळपास १०० वर्षांपूर्वीची घरे बाधित होणार आहेत. त्यामुळे येथील रहिवाशांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यातच रेल्वेच्या या भूमिकेविरोधात स्थानिकांनी एकत्र येत असून त्यांनी लढा उभारण्याचा निर्णय घेतला आहे.पश्चिम रेल्वेवरील विरार-बोरिवलीदरम्यान नव्याने पाच आणि सहा नंबर मार्गावर आणि जवळपास ३० ट्रॅकचे यार्ड तयार करण्याचे काम सुरू करण्यात येणार आहे. याबाबत भूसंपादनासाठी जाहिरात काढण्यात आली होती; परंतु त्याबाबत येथील नागरिकांना कोणती माहिती देण्यात आली नसल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.

## काशिमीरा येथे केकच्या दुकानाला भीषण आग



■ **मीरारोड** : भाईंदर येथील आझाद नगर झोपडपट्टीला लागलेली आगीची घटना ताजी असतानाच आता मीरा भाईंदर शहराचे प्रवेशद्वार असलेल्या काशिमीरा येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर असलेल्या इंटरनॅशनल केकच्या दुकानाला आग लागल्याची घटना घडली आहे. काही महिन्यांपूर्वी याच दुकानात गोळीबार झाल्याची घटना घडली होती आणि आता आगीच्या घटनेमुळे इंटरनॅशनल केकचे दुकान पुन्हा एकदा चर्चेत आले आहे.

शुक्रवारी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास काशिमीरा नाक्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर असलेल्या इंटरनॅशनल केकच्या दुकानाला आग लागली आणि काही मिनिटातच दुकान आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. अग्नीशमनदलाचे प्रमुख प्रकाश बोराडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, इंटरनॅशनल केकच्या दुकानात असलेल्या मीटर बॉक्सला शॉर्ट सर्किटमुळे आग लागली आणि ती दुकानात पसरत गेली. आगीची माहिती मिळताच अग्निशमनदलाचे सिल्व्हर पार्क, पेणकर पाडा, हाटकेश या केंद्रातील पाच बंब ताबडतोब घटनास्थळी पोहोचले आणि काही मिनिटातच अग्नीशमन दलाच्या जवानांनी आग विझवली. या आगीच्या घटनेत कोणतीही हानी झालेली नाही.

## अवैध दारू वाहतूक करणाऱ्या आरोपीस अटक

■ **नालासोपारा** : पेल्हार पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध दारू वाहतूक करणाऱ्या आरोपीस अटक करून लाखो रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.पेल्हार पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत गस्त घालीत असताना गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक सोपान पाटील, यांना माहिती मिळाली की, पेल्हार पोलीस ठाणे हद्दीतून एकजण बोलेरो पिकअप वाहनाने अवैधरित्या दारु घेऊन गुजरात येथे विक्री करता जाणार आहे.

याबाबत खात्रीशिर माहिती मिळाल्या नंतर प्रभारी पोलीस निरीक्षक कुमार गौरव धादवड, यांना माहिती दिली असता त्यांनी सत्यता पडताळून कायदेशिर कारवाई करण्याबाबत आदेश दिले.पोलीस उप आयुक्त परिमंडळ ३, सुहास बावचे, सहायक पोलीस आयुक्त बजरंग देसाई, यांच्या मार्गदर्शनाखाली कुमारगौरव धादवड, प्रभारी पोलीस निरीक्षक



पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सोपान पाटील, पो.हवा. योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, अनिल शेगर, पो. अं. संजय मासाळ, रवि वानखेडे, वाल्मिक पाटील, मिथून मोहिते, राहुल कर्पे, दिलदार शेख, निखिल मंडलिक,अनिल साबळे, शरद राठोड, सुजय पाटील यांनी यशस्वीरित्या कामगिरी पार पाडली. पेल्हार पोलीस ठाण्याचे पोलीस उप निरीक्षक तुकाराम भोपळे व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अंमलदार यांनी या बातमीच्या अनुशंगाने जायका हॉटेलच्या समोर, वाकनपाडा, नालासोपारा येथे सापळा रचून लवकुश - रामनिवास मिश्रा,याला पिकअप वाहनासह अटक केली. पिकअपमध्ये २,३०,४०० रुपये किंमतीचे न्यू टुबोर्ग क्लासिक विथ स्कॉच माल्टस कंपनीचे एकूण ६० बॉक्स त्यामध्ये १४४० बियरचे टिन मिळून आले असून एकुण ११,३०,४०० रु किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

## भाडेकरूंची माहिती पोलिसांना देणे बंधनकारक

■ **नालासोपारा** : परदेशातून अथवा परराज्यातून राहायला येणाऱ्या नागरिकांची माहिती पोलीस ठाण्याला देणे बंधनकारक केले असून देशी आणि विदेशी भाडेकरूंची माहिती न देणाऱ्या घर मालक ,लॉज मालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

वसई विरार व मीरा भाईंदर शहरात परदेशातील नागरिक राहण्यासाठी येऊ लागले आहेत. परंतु शहरात घडणाऱ्या गुन्ह्यांमध्ये बहुतांश परदेशी नागरिकांचा सहभाग आढळून येत आहे. यावर नियंत्रण आणण्यासाठी मिरा भाईंदर - वसई विरार पोलीस आयुक्तालयाने परदेशातून येणाऱ्या नागरिकांना भाडेतत्वावर घर देताना त्यांची माहिती पोलीस ठाण्याला देणे बंधनकारक करण्यात आले आहे. याबाबतचा मनाई आदेश पोलिसांनी जारी केला आहे.शहराचे झपाट्याने नागरीकरण वाढू लागले आहे. तर या शहरातील परिसरात स्वस्तात व भाडेतत्वावर घरे उपलब्ध होत आहेत.




परदेशातील विविध ठिकाणच्या भागातून येऊन वास्तव्य करत आहेत. याची कोणतीच अधिकृत माहिती पोलीस ठाण्याला नाही. यातील काही नागरिक गुन्हेगारी, अंमली पदार्थ तस्करी व विविध प्रकारच्या फसवणूकीच्या गुन्ह्यात सहभाग आढळून येत आहे.

वसई-विरार मीरा भाईंदर शहरात १ मार्च पासून २८ एप्रिलपर्यंत फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम १४४ (१)(२) अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आला आहे. याआधी घरमालक पैशाच्या लालसेपोटी परदेशी नागरिकांची कोणत्याही प्रकारची शहानिशा न करता त्याला भाडेतत्वावर घर देत होता. मात्र आता असे करता येणार नाही. रितसर भाडे करार करून २४ तासाच्या आत नजिकच्या पोलीस ठाण्यात माहिती दिल्याशिवाय भाड्याने देवू नये असे आदेश पोलिसांनी दिले आहेत. जे नियमांचे पालन करणार नाहीत अशावर कारवाई केली जाईल असा इशाराही पोलिसांनी दिला आहे.

## वीजग्राहकांसाठी लोक अदालत

■ **कल्याण** : कल्याण परिमंडलातील कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित करण्यात आलेले ग्राहक तसेच वीजबिलाबाबत वाद आणि वीज चोरीच्या दाखलपूर्व व प्रलंबित प्रकरणांचा तडजोडीने निपटारा करण्याची संधी आहे. संबंधित ग्राहकांनी तालुका न्यायालय स्तरावर रविवार, ३ मार्च रोजी आयोजित लोक अदालतीत सहभागी होऊन आपापली प्रकरणे सामोपचाराने निकाली काढावीत, असे आवाहन महावितरणने केले आहे.

कल्याण परिमंडल कार्यक्षेत्रातील प्रत्येक तालुका न्यायालयात ३ मार्चला सकाळी ११ ते दुपारी २ दरम्यान राष्ट्रीय लोक अदालत आयोजित करण्यात आली आहे. परिमंडलातील सुमारे १ लाख ३५ हजार ८०६ ग्राहकांना थकीत वसुलीसाठी लोक अदालतीत सहभागी होण्याबाबत विधी विभागाकडून नोटिसा पाठवण्यात आल्या आहेत. यात कल्याण मंडल एकमधील १३ हजार ८६०, कल्याण मंडल दोनमधील ४५ हजार १५०, वसई मंडलातील ३८ हजार ८४२ आणि पालघर मंडल कार्यालयांतर्गत ३७ हजार ९५४ प्रकरणांचा समावेश आहे. नोटीस मिळाली नसेल तरीही या ग्राहकांना लोक अदालतीत सहभागी होत आपल्या प्रकरणांचा निपटारा करून घेता येणार आहे.

## मुंब्र्यात आढळली नकली बंदुकांची बॅग

■ **मुंब्रा** : राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार यांच्या गटाचे मुंब्रा कळवा विधानसभा अध्यक्ष शमीम खान यांच्या कार्यालयासमोर ६ बंदुकांनी भरलेली बॅग सापडल्याने खळबळ उडाली. मात्र पोलिस तपासात या बंदुका नकली असल्याचे सापडल्याने सर्वांनीच सुटकेचा निश्वास सोडला. शुक्रवारी सकाळी खान यांच्या कार्यासयासमोर एका पिशवीत बंदुका असल्याचे वृत्त पसरले. त्यामुळे काही काळ खळबळ उडाली. त्वरित पोलिसांना बोलावण्यात आले. पोलिसांनी परिस्थितीचे गांभीर्य जाणून त्वरित कार्यालयाजवळ धाव घेतली.

## अल्पवयीन मुलांकडून तरुणाला मारहाण

■ **भिवंडी** : उसने पैसे मागितल्याच्या रागातून दोन अल्पवयीन बालकांनी तरुणाला मारहाण करून गंभीर जखमी केल्याची घटना शहरातील कामतघर परिसरात घडली आहे. या मारहाणीचा शहर पोलीस ठाण्यात दोघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसाररामनाथ जगवेम मुखीया ( २७) हा तरुण त्याचा मित्र शंकर सोबत बाबू सर्व्हिस सेंटरच्या समोर असताना रामनाथने आरोपीकडे उसने पैसे मागितले.दरम्यान या गोष्टीचा राग मनात धरून रामनाथ यास शिवीगाळ करून मारहाण केली.

## दुहेरी हत्याकांडातील आरोपीला अटक

■ **बोईसर**: तारापूर जवळील कुडण ग्रामपंचायतीच्या क्षेत्रातील मोठे कुडण येथील मुकुंद पाटील व भीमराव पाटील या दोन सख्या वृध्द भावांची गुरुवारी संध्याकाळी एका परप्रांतीय व्यक्तीने निर्घृण हत्या केली. आणि फरार झाला.या घटनेमुळे कुडण परिसरात मोठ्या प्रमाणात भीतीचे वातावरण पसरले असतानाच त्याला रात्री दहाच्या सुमारास पोलिसांनी ग्रामस्थांच्या मदतीने पकडल्यानंतर ग्रामस्थांनी सुटकेचा निश्वाःस सोडला.

या आरोपीने दोन्ही भावांची ज्या क्रूर पद्धतीने हत्या केली त्याचे छायाचित्र समाजमाध्यमांवर प्रसिद्ध होताच तो आरोपी असे पुन्हा कृत्य करण्याच्या शक्यतेने सर्वत्र प्रचंड भीतीचे वातावरण पसरले होते. त्यामुळे कुडण गावातील तरुण वर्ग मोठया प्रमाणात संतप्तपणे रस्त्यावर उतरून पोलिसांच्या मदतीने अंधारात त्या आरोपीचा शोध घेत असतानाच तो आरोपी गावालगत असलेल्या करणखाडीतील दलदलीत असलेल्या झाडीत लपून बसलेला आढळताच

### ग्रामस्थांनी सोडला सुटकेचा नि:श्वास



पोलीस व तरुणांनी त्याच्यावर झडप घालून त्याला पकडले. त्यावेळी जमाव प्रचंड संतप्त झाला होता.दुहेरी हत्याकांडची ही दुर्दैवी घटना घडल्याने सुरुवातीला प्रचंड गोंधळाचे वातावरण होते. मात्र वेळीच तारापूर पोलीस ठाण्याचे पोलीस व जिल्हा पोलिस दलाकडून अतिरिक्त कुमक घटनास्थळी पोहचून अज्ञात आरोपीचा शोध सुरू केला व त्याला काही तासातच पकडण्यात यश आल्याने पुढील अनर्थ टळला मृत मुकुंद पाटील यांच्या पश्चात पत्नी तीन मुले व एक विवाहित मुलगी आहे तर भीमराव अविवाहित होते.दोन्ही मृतदेहाचे तारापूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात शव विच्छेदन केल्यानंतर त्यांचा अंत्यविधी दुपारी करण्यात आला. त्यावेळी मोठया प्रमाणात गर्दी होती.

## रेल्वे उड्डाणपुलाच्या कामासाठी लवकरच निविदा

### ■ केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांची माहिती

■ **बदलापूर** : गेल्या अनेक वर्षांपासून प्रतिक्षेत असलेल्या वांगणी रेल्वे उड्डाणपुलाचे काम लवकरच मार्गी लागण्याची चिन्हे आहेत. या कामासाठी लवकरच निविदा प्रक्रिया केली जाणार असून लवकरात लवकर काम सुरू व्हावे, असा प्रयत्न असल्याचे केंद्रीय पंचायत राज राज्यमंत्री कपिल पाटील यांनी स्पष्ट केले आहे.

बदलापूर रेल्वे होम प्लॅटफॉर्म लोकार्पणानंतर आयोजित रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे व केंद्रीय पंचायत राज राज्यमंत्री कपिल पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात आमदार किसन कथोरे यांनी बदलापूर पश्चिमेकडील बॅरेज रोड व वांगणी या ठिकाणी रेल्वे उड्डाणपूल उभारण्याची तसेच बदलापूर रेल्वे स्थानक परिसरासाठी एमएमआरडीएने दिलेल्या सॅटीसच्या प्रस्तावाला रेल्वेची मंजुरी मिळावी, अशी मागणी केली होती.यावर बोलताना केंद्रीय पंचायत राज राज्यमंत्री कपिल पाटील यांनी वांगणी रेल्वे उड्डाणपुलाला मंजुरी मिळाली असून लवकरात लवकर निविदा प्रक्रिया करून लवकरात लवकर काम कसे सुरू होईल,यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे स्पष्ट केले.



■ त्यामुळे गेल्या काही वर्षात वांगणीची लोकसंख्या झपाट्याने वाढली आहे. वाढत्या लोकसंखेबरोबर वाहनांची संख्याही वाढल्याने वाहतूक कोंडीची समस्याही वाढली आहे. या पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिकांकडून तसेच रेल्वे प्रवासी संघटनेकडूनही सातत्याने याबाबत मागणी होत आहे. त्याची दखल घेऊन आमदार किसन कथोरे यांनी बदलापूर रेल्वे होम प्लॅटफॉर्म लोकार्पण कार्यक्रमात वांगणीकरांसाठी महत्वाच्या असलेल्या रेल्वे उड्डाणपुलाचा मुद्दा उपस्थित केला.

बदलापूर जवळील ग्रामीण चेहरा असलेले वांगणी आता शहराच्या दिशेने वाटचाल करू लागले आहे. अवकाश दर्शन,नर्सरी व पावसाळी सहलीसाठी वांगणी पूर्वीपासूनच प्रसिद्ध आहे.त्यामुळे यानिमित्ताने मोठया संख्येने पर्यटक,विद्यार्थी तसेच व्यापारी वांगणीत येत असतात. त्याचबरोबर गेल्या काही वर्षात वांगणीत बांधकाम व्यवसायालाही तेजी आली आहे. पूर्वी सेकंड होम म्हणून वांगणीचा विचार केला जात असे. परंतु गेल्या काही वर्षात वांगणीत अनेक निवासी इमारती उभ्या राहिल्या असून अंबरनाथ,बदलापूर वा कल्याण डोंबिवलीच्या तुलनेत स्वस्तात घरे उपलब्ध होत असल्याने अनेक सर्वसामान्य चाकरमान्यांनी वास्तव्यासाठीही वांगणीला पसंती देण्यास सुरुवात केली आहे.



## पारा ३७ अंशांपार झाल्याने उष्माघाताचा धोका वाढला

### उन्हाळ्यात काळजी घेण्याचे डॉक्टरांचे नागरिकांना आवाहन

■ **ठाणे** : उन्हाचा वाढता दाह ठाणेकरांसाठी त्रासदायक ठरत आहे. त्यातच दुपारच्या वेळी प्रवास करणाऱ्यांसमोर उष्माघाताचे संकट घोंघावत आहे . मार्च महिन्याच्या पहिल्याच दिवशी उष्णतेचा पारा ३७ अंशाच्या पार झाला आहे. याने आरोग्याच्या विविध तक्रारी उद्भवल्या असून यामध्ये उष्माघाताचा धोका सर्वाधिक आहे.

रस्त्यातून चालताना घाम फुटून डोळ्यासमोर आलेला अंधार, त्यानंतर जाणवणारा थकवा आणि अचानक येणारी चक्कर अशा तक्रारी सध्या वाढत आहे. कोणत्याही वयोगटातील व्यक्तीला असा त्रास होऊ शकतो असे डॉक्टरांतर्फे सांगण्यात येते. उन्हाळ्यात अशा स्वरूपाच्या तक्रारी सामान्य असल्या तरी ही लक्षणे उष्माघाताची ठरत असल्याने त्याकडे अधिक गांभीर्याने पाहण्याची गरज डॉक्टरांतर्फे व्यक्त केली जात आहे. वाढत्या तापमानासह प्रकृतीच्या समस्याही वाढतात. यामध्ये शरीरातील घटणाऱ्या पाण्याच्या पातळीमुळे थकवा, चक्कर, डोकेदुखी, पोटाचे विकार असे आजार दरवर्षी उद्भवत असतात .दिवसभर उन्हाचा तडाखा जाणवत असला तरी सकाळी साडेअकरा ते दुपारी चार या वेळेत तापमानाची सर्वाधिक नोंद घेतली जाते.

त्यामुळे या काळात घराबाहेर पडणाऱ्या तसेच लोकलने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना प्रकृतीच्या चिंता अधिक भेडसावत आहेत. यामध्ये सनस्ट्रोक, त्वचाविकार तसेच पोटाचे विकार यांचे प्रमाण सर्वाधिक आहे.तसेच कावीळ, त्वचाधाह,चक्कर येणे, ॲसिडिटी,हिट स्ट्रोक, पोटाचे आजार,टायफाड, उलटया, डोके दुखणे ,सायनस ,दम लागणे यासारखे रुग्ण मोठ्या प्रमाणात आढळत आहेत.उष्माघातामुळे दाखल होणाऱ्या रुग्णांमध्ये महिलांचे प्रमाण अधिक असल्याचे डॉक्टर सांगतात. पुरेशा काळजीचा अभाव, पाण्यासह जेवणाची चुकलेली वेळ तसेच थंड पदार्थांचे कमी सेवन यामुळे उष्माघात उद्भवत असल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे .डोळ्यांना दिसणारे ऊन हे प्रकृतीसाठी अत्यंत घातक आहे. यामुळे रुग्णांच्या संख्येतही वाढ झाली आहे.ठाणे शहरातील तापमान मार्च महिन्याच्या एक तारखेला दुपारी पावणे तीन वाजता ३७.३ इतके नोंदवले गेले आहे . यासंदर्भात डॉ. शैलेश उमाटे यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले की, हे तापमान मानवी आरोग्याला धोकादायक ठरण्याची शक्यता आहे.याने मागील काही दिवसापासून उष्मघाताच्या रुग्णांमध्ये वाढ झाली आहे. तसेच उष्माघाताने थकवा येणे, चक्कर येणे, क्रम्प येणे अशी सौम्य लक्षणे असतात. तीव्र लक्षणांत काहींना आकडी, येवू शकते.सहसा, लहान मुले, म्हातारी माणसे आणि स्त्रियांना हा त्रास होवू शकतो.या तिन्हीही गटातील लोकांनी उन्हात जाणे टाळावे. बाकीच्यांनी विशेष काळजी घ्यावी. त्यात टोपी घालावी किंवा डोक्यावर पांढरा कपडा बांधावा. सतत पाणी पित राहावे. कोकम सरबत, उसाचा रस, लिंबूपाणी अशी सरबते स्वच्छ ठिकाणाहून प्यावे. काही लक्षणे जाणवल्यास त्वरित डॉक्टरांची भेट घ्यावी.असे उमाटे यांनी सांगितले.याबाबत ठाणे महापालिकेच्या



### अवकाळीची हलकीशी सर

■ **ठाणे**: ठाण्यात शुक्रवारी अवकाळी पावसाच्या सरी बरसल्याने सकाळच्या वेळेत फिरण्यासाठी निघालेल्या अनेकांची धावपळ उडाली . केवळ पाच ते सात मिनिटाच्या पडलेल्या या पावसानंतर दिवसभर उकाडा जाणवत होता.शुक्रवारी सकाळीच पडलेल्या पावसाने मॉर्निंग वॉकला निघालेल्यांची चांगलीच तांराबळ उडाल्याचे दिसून आले. अवघा पाच ते सात मिनिटे पाऊस पडला. त्यानंतर दुपार पर्यंत ढगाळ वातावरण दिसून येत होते. परंतु अवकाळी पावसामुळे वातावरणातील उकाडा अधिकच वाढल्याचे दिसून आले होते. दुपार नंतर उन्हाच्या झळा अधिक तीव्र होत्या. परंतु या काही मिनिटांच्या पावसात कोणत्याही प्रकारची जीवीत किंवा वित्त हानी झाली नाही. मागील काही दिवसापासून वातावरणात झालेल्या बदलामुळे सकाळी उन्हाच्या झळा आणि रात्री हवेत गारवा अशी स्थिती होती. परंतु मागील दोन दिवसापासून उकाडा अधिकच वाढल्याचे दिसून आले.त्यानंतर शुक्रवारची सकाळ उजाडताच सातच्या सुमारास शहरातील विविध भागात पावसाच्या जोरदार सरी बरसल्याचे दिसून आले.

- उष्णतेपासून सुरक्षेसाठी हे करू नका
- पार्किंग केलेल्या वाहनामध्ये मुले आणि पाळीव प्राण्यांना सोडून जाऊ नका.
- उच्च प्रथिनयुक्त आहार आणि शिळे अन्न खाऊ नका.
- मद्यसेवन, चहा, कॉफी आणि कार्बोनेटड सॉफ्ट ड्रिंक्स पिऊ नका.
- त्यामुळे डिहायड्रेशनचा त्रास होऊ शकतो.
- उष्णतेपासून सुरक्षेसाठी हे करा
- तहान नसली तरी पुरेसे पाणी प्या.
- सौम्य रंगाचे, सैल आणि कॉटनचे कपडे वापरा.
- बाहेर जाताना गॉगल्स, छत्री, टोपी, बूट आणि चप्पल वापरा
- प्रवास करताना सोबत पाणी घ्या.
- घर थंड ठेवा, पडदे, झडपा, सनशेड बसवा आणि रात्री खिडक्या उघड्या ठेवा.
- अशक्त, जाणवत असेल तर त्वरीत

## मुंबई विद्यापीठात मराठी भाषेचा कॉर्पस विकसित

### उपयोजित मानसशास्त्र विभागाचा उपक्रम

■ **मुंबई** : मुंबई विद्यापीठातील उपयोजित मानसशास्त्र विभागाने मराठी भाषेचे कॉर्पस विकसित केले आहे. मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून हे कॉर्पस प्रदर्शित करण्यात आले आहे. विभागातील प्राध्यापक डॉ. विवेक बेल्हेकर आणि त्यांच्या संशोधन चमूने संस्कृती, भाषा आणि व्यक्तिमत्व या विषयावर संशोधन करून हा कॉर्पस विकसित केला आहे. कॉर्पस म्हणजे एखाद्या विषयाच्या लिखाणातील जवळपास सर्व शब्दांचा संग्रह. शब्द मोजणी कॉर्पसमध्ये प्रत्येक शब्द किती वेळा वापरला आहे, याची माहिती असते. मुंबई विद्यापीठात विकसित केलेल्या मराठी भाषेच्या कॉर्पसमध्ये प्रत्येक शब्दाचा वापर प्रत्येक दशकात किती वेळा होतो, याची माहिती आहे. यासाठीचे अप्लिकेशन डॉ.विवेक बेल्हेकर आणि राधिका भार्गव यांनी विकसित केले असून, त्यातून उपलब्ध शब्दाची माहिती आलेखाच्या स्वरूपात प्राप्त होणार आहे. भारतात भाषांची मोठी विविधता आहे. मराठी ही भारतात सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषापैकी आहे. मराठी भाषेचे ८३ दशलक्षाहून अधिक भाषिक आहेत. विभागामार्फत करण्यात येत असलेल्या या विविध भारतीय भाषांमध्ये, बोलीभाषेतील व्यक्तिमत्व दर्शवणाऱ्या शब्दांचा वापर करून मानसशास्त्रीय घटकांच्या रचनेचा अभ्यास केला जातो. हा अभ्यास मनो-भाषिक दृष्टिकोन म्हणून ओळखला जातो. या संशोधनासाठी एखाद्या भाषेतील कोणते शब्द किती वेळा वापरले जातात, याची माहिती महत्त्वाची असते. गुगल एन-ग्रामने ही माहिती अनेक भाषांसाठी उपलब्ध करून दिली असली तरी त्यात भारतीय भाषांचा समावेश नाही. त्यामुळे मराठी आणि हिंदीच्या मानस-भाषिक अभ्यासासाठी डॉ. विवेक बेल्हेकर आणि त्यांच्या पीएच.डी.च्या विद्यार्थिनी राधिका भार्गव यांनी मराठी आणि हिंदी कॉर्पस विकसित केला आहे. या कामाचा शोधनिबंध एल्साव्हीअरच्या 'अप्लाईड कॉर्पस लिंग्विस्टिक्स' या जर्नलमध्ये नुकताच प्रसिद्ध झाला असून, यातून तयार झालेला कॉर्पस हा संशोधकांच्या वापरासाठी खुला करून देण्यात आल्याचे डॉ. विवेक बेल्हेकर यांनी सांगितले. या कामाचा वापर भाषाशास्त्र, सामाजिक शास्त्रे, मजकूर खणन (टेक्स्ट मायनिग), यंत्र-शिक्षण, इत्यादी विविध क्षेत्रातील संशोधक करू शकतात. या संदर्भातील



अधिक काम मुंबई विद्यापीठाच्या उपयोजित मानसशास्त्र विभागात सुरू असून, लवकरच अधिक उपयोगी भाषिक विश्लेषणाची साधने संशोधक आणि सर्वसामान्यांना उपलब्ध करून दिले जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.